सुविचार

यदि आप प्रेमयुक्त होने के साथ – साथ नियमयुक्त होकर नहीं रह सकते तो आपमें अवश्य किसी शक्ति की कमी है । अपनी जाँच करें व उस कमी को पूरा करें ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८० ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# झेलेन्स्कींचे निमंत्रण स्विकारले

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी २३ ऑगस्टला युक्रेन दौऱ्यावर जात आहेत. ३० वर्षानंतर एखादे भारतीय पंतप्रधान हा दौरा करत आहेत. याआधी पंतप्रधान मोदी २१-२२ ऑगस्टला पोलंड दौऱ्यावर जातील. ४५ वर्षानंतर भारताचे एखादे पंतप्रधान पोलँड दौऱ्यावर जातील. पंतप्रधान मोदींचा युक्रेन दौरा मॉस्कोमध्ये रशियाचे राष्ट्रपती व्लादीमीर पुतिन यांच्या भेटीनंतर एक महिन्यांनी होत आहे.



युक्रेनच्या आधी पंतप्रधान पोलँड दौऱ्यावर

पंतप्रधान नरेंद्र मोदी २१ आणि २२ ऑगस्टला पोलँडमध्ये राहतील. येथे भारतीय समुदायाच्या लोकांशी बातचीत करतील. तसेच पोलँडमधील त्या स्मारकांचा दौराही करती जे जामनगर आणि कोल्हापूरचे मूळ राखून आहेत. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार भारत नेहमीच युक्रेनमध्ये युद्ध सोडवण्यासाठी कूटनिती आणि बातचीतला समर्थन देत असतो.

युक्रेनकडून अधिकृत विधान

पंतप्रधान मोदींच्या युक्रेन दौऱ्याबाबत तेथील राष्ट्रपती वोलोडिमिर झेलेन्स्की यांच्या कार्यालयाकडून अधिकृत विधान जारी करण्यात आले आहे. विधानात म्हटले की आमच्या द्वीपक्षीय संबंधाच्या इतिहासात एखाद्या भारतीय पंतप्रधानांचा युक्रेनचा हा पहिलाच दौरा आहे. दौऱ्ययादरम्यान युक्रेनचे राष्ट्रपती वोलोडिमिर झेलेन्स्कीसोबत द्वीपक्षीय आणि बहुपक्षीय सहयोगाच्या मुद्द्यावर चर्चा होईल. पंतप्रधान मोदींचा हा दौरा १९९१मध्ये युक्रेन स्वतंत्र झाल्यानंतर एखाद्या भारतीय पंतप्रधानांचा पहिला दौरा असेल. गेल्या महिन्यात राष्ट्रपती वोलोडिमिर झेलेन्स्कीचे चीफ ऑफ स्टाफ अँड्री यरमक यांनी म्हटले होते की पंतप्रधान मोदी युक्रेनमध्ये शांतता स्थापन करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावू शकतात.

पंतप्रधान मोदींचा मॉस्को दौरा ९-१० जुलैदरम्यान नाटो शिखर संमेलनात (पान २ वर)

# तर मी राजिनामा देईन आणि राजकारणातून संन्यास घेईन


मुंबई : राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा चांगलाच पेटला आहे. दोन्ही समाजांनी केलेल्या परस्परविरोधी मागण्यांमुळे राज्य सरकार कोंडीत सापडले आहे. त्यातच मराठा आंदोलनातील नेते मनोज जरांगे पाटील सातत्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप करत असतात. त्यांनी सगेसोयरेंची मागणी लावून धरली आहे आणि फडणवीस त्यात अडथळा आणतात, असा आरोप त्यांनी केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मराठा आरक्षणाबाबत काम करु इच्छितात पण देवेंद्र फडणवीस त्यांना हे काम करु देत नाहीत, असेहि ते म्हणाले आहेत. यावर आज देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना चोख प्रत्युत्तर दिले आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, मनोज जरांगे पाटलांचे माझ्यावर विशेष प्रेम आहे. पण हे देखील मला या निमित्ताने सांगितले पाहिजे की राज्याचे सगळे अधिकार हे मुख्यमंत्र्यांकडे असतात, इतर सगळे मंत्री मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अधिकारांवर त्या ठिकाणी काम करत असतात. मी तर त्याच्या पुढे जाऊन म्हणेन, कारण शिंदे साहेब आणि मी एकत्रितपणे काम करतो. शिंदे साहेबांना पूर्ण पाठिंबा आणि पाठबळ माझे आहे. त्यामुळे त्यांनी शिंदे साहेबांना विचारावे आणि शिंदे साहेबांनी जर असे म्हटले की मराठा आरक्षणाकरिता कुठलाही निर्णय घ्यायचा त्यांनी प्रयत्न केला आणि तो प्रयत्न मी थांबवला, तर त्या क्षणी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातून देखील निवृत्त होईन.

पुढे ते म्हणाले, एक लक्षात ठेवा आजपर्यंत मराठा समाजाकरता जे काही निर्णय झाले ते एक तर मी केले, किंवा शिंदे साहेबांनी केले. शिंदे साहेबांच्या पाठीशी मी ठामपणे उभा राहिलेलो आहे. त्यामुळे अशा (पान २ वर)

## युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताने बनवले कामिकाजे ड्रोन



नवी दिल्ली : - रशिया-युक्रेन आणि इराण-लेबनॉन, इस्त्राईल- पॅलेस्टाईन यांच्यात सुरू असलेले दोन युद्ध पाहून भारतीय वैज्ञानिकांनी एका घातक अस्त्राची निर्मिती केली आहे. भविष्यात युद्धाचा परिणाम बदलण्याची या शस्त्राची ताकद आहे. भारतीय वैज्ञानिकांनी कमी काळात हे अस्त्र बनवले आहे. इस्रोची सुद्धा या शस्त्राच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका आहे.

जगाच्या पाठिवर सुरु असलेले हे युद्ध पाहून भारताने सुद्धा एक घातक अस्त्र तयार केले. त्याचे नाव आहे कामिकाजे ड्रोन. भारताची एलिट संशोधन संस्था नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीजने कामिकाजे ड्रोन विकसित केलंय.

स्वदेशी बनावटीचे इंजिन या ड्रोनमध्ये असून १,००० किलोमीटर अंतरापर्यंत हल्ला करण्याची या ड्रोनची क्षमता आहे. एनएएल चे संचालक अभय पाशिलकर यांच्या नेतृत्वाखाली या घातक ड्रोनची निर्मिती करण्यात आली आहे. हे कमी खर्चिक, मानवरहीत परिणामकारक हवाई वाहन आहे. एका ठराविक उंचीवरुन हे कामिकाजे ड्रोन उड्डाण करते. स्फोटक वाहून नेणारे हे ड्रोन टार्गेट जवळ काही वेळ भ्रमण करु शकते. टार्गेटला धडकल्यानंतर मोठा विस्फोट होतो. (पान ७ वर)

# नवाब मलिकांच्या कन्येस राष्ट्रवादीत मोठी जबाबदारी: अजित पवार

मुंबई : भाजप आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर गंभीर आरोप करणारे राष्ट्रवादी कॉँग्रेसचे आमदार नबाव मलिक यांनी अखेर महायुतीतील अजित पवारांच्या राष्ट्रवादीत असल्याचं स्पष्ट केलं. अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रेत नवाब मलिक आज व्यासपीठावर दिसून आल्याने त्यांची भूमिका उघड झाली आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या फुटीनंतर मलिक कोणाकडे राहणार, यावरुन राष्ट्रवादीत रणकंदन सुरू होतं. मात्र, मलिक यांच्या भूमिकेनंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी खंत व्यक्त केली होती. जेव्हा फडणवीस नवाब मलिकांना अंतर देत होते तेव्हा सुप्रिया सुळे एकटी त्यांच्या बाजूने बोलली होती, असेही सुळे यांनी बोलून दाखवले. पण, आज अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून नवाब मलिक यांची कन्या सना मलिक यांना मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.

अजित पवार यांनी सना मलिक यांना राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये देण्यात येत असलेल्या जबाबदारीची घोषणा केली. सना मलिक वडिलकीच्या नात्याने माझ्याकडे येत असते. तिच्या विधानसभा क्षेत्रातील लोकांची कामं ती घेऊन येत असते. आज मी जाहीर करतो राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाची सना मलिक ही स्पोकपर्सन प्रवक्ता असेल. एक मोठी जबाबदारी आपण तिला देत आहोत, असे म्हणत अजित पवार यांनी नवाब मलिक यांच्या कन्येकडे मोठी जबाबदारी दिली आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात नव्या चेहऱ्यांना संधी देत असतो. सनाचं इंग्रजी, हिंदी चांगलं आहे, आता मराठीपण चांगला होईल, तू घाबरू नको, असेही अजित पवार यांनी म्हटले. (पान ७ वर)

# अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करणार :ना. बनसोडे

## खासदार डॉ. शिवाजी काळगे व जिल्हा कृषी अधिकारी यांची भेट



जळकोट : प्रतिनिधी- तालुक्यातील वांजरवाडा, होकर्णा, वडगाव, सोरगा, चेरा गावांत ता.१६ ऑगस्ट रोजी ढगफुटीसदृश पावसामुळे पिकांना मोठा फटका बसला आहे. रविवारी राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे, खासदार डॉ. शिवाजी काळगे व जिल्हा कृषी अधिकारी यांनी नुकसानग्रस्त भागात भेट देत शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून सरसकट मदत व पीकविमा मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

जळकोट तालुक्यात शुक्रवारी वांजरवाडा, होकर्णा, वडगाव, सोरगा, चेरा परिसरातील गावात दोन तास झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. ता. १८ रोजी ना. संजय बनसोडे यांनी होकर्णा, वडगाव , केकतसिंदगी येथे प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार सुरेखा स्वामी, तालुका कृषी अधिकारी आकाश पवार, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार उपस्थित होते. यावेळी शासनाकडून (पान ७ वर)

# जन्मोत्सव हा आत्मचिंतनाचा दिवस : श्रीकाशी जगद्गुरू

वाराणसी : वाराणसी येथील जंगमवाडी मठात ज्ञानसिंहासनाधीश्वर डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचा ७८ वा जन्मोत्सव १८/०८/२०२४ रोजी अत्यंत भव्य स्वरूपात साजरा झाला. याप्रसंगी आपल्या आशीर्वचनात महास्वामीजी म्हणाले, जन्मदिन हा केवळ आनंदोत्सव नाही. यानिमित्ताने जीवनाचा आढावा घेऊन आत्मचिंतन केले पाहिजे. आजपर्यंत काय केले? पुढे काय करायचे? हा विचार करण्यासाठी वाढदिवसाचे आयोजन झाले पाहिजे. पुढे बोलताना महास्वामीजी म्हणाले, भारतीय दर्शनशास्त्रात तत्त्ववेत्ते म्हणतात, जन्म दुःखम् जन्म दुःखदायी आहे. त्रासातून जन्म असतो. मृत्यूही दुःखदायी आहे. मधले आयुष्यही असेच मानले जाते. पुढचा जन्मच नको असे आचरण पाहिजे. याचे चिंतन करण्याचा दिवस म्हणजे

## अष्टावरण विज्ञान चे झाले प्रकाशन



वाढदिवस होय.

या समारंभात महाराष्ट्राचे माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी संपूर्ण मठात सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याची प्रार्थना केली. हा संकल्प म्हणजे पाटील परिवाराला सुवर्णसंधी असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी छोट्या स्वरूपात अशा प्रकारच्या सेवेची संधी परमपूज्य महास्वामीजींनी दिल्याची आठवण त्यांनी करून दिली. त्यांनी स्वीकारलेल्या या सेवेबद्दल महास्वामीजींनी त्यांना सन्मानपूर्वक आशीर्वाद दिला. याप्रसंगी उपस्थित असलेले लातूरचे संपादक प्रा. मोतीपवळे यांनी बसवराज पाटील भाग्यवान असल्याचे सांगितले. महास्वामीजींचा संकल्प पूर्ण करण्याची संधी मिळणे हे भाग्यवंतालाच शक्य असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी लिखित अष्टावरण विज्ञान ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन बी. एच. यु. चे प्रा. डॉ. कमलेश झा आणि बसवराज पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. सोलापूरचे कवी लिं. कुमार कोठावळे यांनी या ग्रंथाचा मराठी अनुवाद केला आहे. डॉ. कमलेश झा यांनी वीरशैवांच्या अष्टावरण विज्ञानावर अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले.

पहाटे जगद्गुरू विश्वाराध्य मंदिरात अभिषेक करण्यात आला. हैदराबादचे वेदमूर्ती विश्वनाथ शास्त्री आणि मठातील वेदमूर्ती मल्लिकार्जुन शास्त्री यांनी वैदिक यज्ञाचे पौरोहित्य केले. मल्लिकार्जुन शास्त्री यांच्या वेदपठनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. राजस्थानच्या भक्तांनी संगीत कार्यक्रमाद्वारे कार्यक्रमात रंगत आणली. विश्वाराध्याच्या आरतीनंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. मठाचे व्यवस्थापक आर. के. स्वामी यांनी प्रास्ताविक तर प्रा. रेवणसिद्ध शाबादे यांनी सूत्रसंचालन केले. नलिनी चिरमे, शिवानंद हिरेमठ, सर्व भक्त आणि कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

# देशातील पहिले खुले तोफ संग्रहालय देवगिरी किल्ल्यावर

छत्रपती संभाजीनगर : तुम्ही कधी ना कधी देवगिरी किल्ल्यावर गेले असतालच; पण या किल्ल्यावर किती तोफा आहेत, हे तुम्हाला माहीत आहे का? देशातील पहिले खुले तोफ संग्रहालय याच ठिकाणी असून अगदी किल्ल्याच्या प्रवेशद्वारापासून तर उंच अशा शेवटच्या टोकांपर्यंत तुम्हाला तोफाच तोफा पाहायला मिळतील.



भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणतर्फे ऐतिहासिक देवगिरी (दौलताबाद) किल्ल्यावर तोफांचे भव्य असे संग्रहालय साकारण्यात आले आहे. चांद मीनारसमोरील जागेत हे संग्रहालय आहे. देशातील अशाप्रकारचे पहिले खुले तोफ संग्रहालय असल्याचे सांगितले जाते.

देवगिरी किल्ल्यावर एकूण २६९ तोफा आहेत. काही तोफा प्रवेशद्वाराजवळ (महाकोट) आहेत. चांद मीनारसमोर खुल्या संग्रहालयात ५३ तोफा आहेत. किल्ल्यावर ठिकठिकाणी बुरुजावर तोफा आहेत. काही तोफा किल्ल्याच्या आतमध्ये ठेवण्यात आल्या आहेत. किल्ल्याच्या सर्वांत वरच्या भागात काळा पहाड तोफ आहे.

किती दूरपर्यंत मारा, कोणत्या धातूचा वापर?

साडेतीन कि.मी. अंतरापासून तर ९ कि.मी. अंतरापर्यंत मारा करणा-या तोफ देवगिरी किल्ल्यावर आहेत. लोखंडी ओतीव तोफा, पंचधातूच्या ओतीव तोफा, मिश्र पद्धतीने बनविलेल्या बांगडी तोफा दिसून येतात.

या तोफेचे वजन तब्बल १४ टन

देवगिरी किल्ल्यावर सर्वाधिक म्हणजे १४ टन वजनाची एक तोफ आहे. ही तोफ म्हणजे मेंढा तोफ. या तोफेची ९ कि.मी. अंतरापर्यंत मारा करण्याची क्षमता आहे. ही तोफ पंचधातूपासून बनविण्यात (पान ७ वर)

# रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचा पदग्रहण सोहळा थाटात

## रोटरीचे सगळ्याच क्षेत्रात जगभरात उत्कृष्ट कार्य : खा. डॉ. शिवाजी काळगे




लातूर / प्रतिनिधी- रोटरी परिवाराचे सगळ्याच क्षेत्रात संपूर्ण जगभरात अत्यंत उत्कृष्ट कार्य आहे. त्यामुळे रोटरी परिवाराचा प्रत्येक सदस्य अभिनंदनास पात्र असल्याचे गौरवोद्गार खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी काढले.

रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा नुकताच थोरमोठे लॉन्स मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. त्यावेळी खा. डॉ. काळगे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विलासराव देशमुख वैद्यकीय शासकीय महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ. उदयसिंह मोहिते - पाटील यासह रोटरी परिवारातील डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे , इंजि. सुधीर लातूरे, नाणिक जोधवानी, पुरुषोत्तम नोगजा , नागेश स्वामी, लक्ष्मीकांत सोनी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे नूतन अध्यक्ष म्हणून डॉ. संजय वारद यांनी मावळते अध्यक्ष पुरुषोत्तम नोगजा यांच्याकडून तर नूतन सचिव विनोद पंडगे यांनी मावळते सचिव नागेश स्वामी यांच्याकडून पदभार स्वीकारला. नूतन सचिव इंजि. विनोद पंडगे यांनी क्लबच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा परिचय करून दिला. सर्व पदाधिकाऱ्यांचे खा. डॉ. काळगे यांच्या हस्ते रोटरीची पिन देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी आपण अहमदनगरला जगदविख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया यांच्यासोबत काम करताना रोटरी परिवाराचे कार्य अत्यंत जवळून पाहिल्याचे सांगितले. रोटरी परिवाराचे जागतिक स्तरावरचे महान कार्य पाहून आपण हरखून गेल्याचे सांगितले. क्षेत्र कोणतेही असो, त्या ठिकाणी सर्वतोपरी मदत - सहकार्य करण्याकामी रोटरी परिवार तत्पर असतो. लातुरात रोटरी परिवाराच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेल्या नदी खोलीकरणाचा लाभ (पान ७ वर)



# आपल्या माणसांची आपुलकी वेगळी

लातूर : गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या टूरमध्ये वेगवेगळे अनुभव येत आहेत. सदिच्छा दीपक शिंदे यांच्या घरी भेट दिली असता परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.

या वेळी ललित तोष्णीवाल, मुन्ना हाश्मी, मनोज शिंदे, पप्पू मगर, विजय मस्के, आदिती शिंदे, सुरेश कांबळे, शिवलिंग कांबळे, युवराज शिंगाडे, जयाताई आदमाने, भाग्यश्रीताई शिंदे, प्रियांकाताई शिंदे आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना व नव मतदारासाठी मोफत ऑनलाईन नोंदणी सेवा केंद्राचा शुभारंभ



लातूर : भाजपचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांच्या वतीने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना व नव मतदार मोफत ऑनलाईन नोंदणी सेवा केंद्राचा शुभारंभ दि. १८ ऑगस्ट रोजी लातूर शहरातील महात्मा गांधी चौक येथे भाजप शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला.

प्रारंभी श्री महालक्ष्मी देवीचे दर्शन घेऊन या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली.महायुती सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी दलाल, एजंटांकडून महिलांची आर्थिक लूट केली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर भाजप शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी स्वतः पुढाकार घेवून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची मोफत ऑनलाईन नोंदणी करण्याची सुविधा भाजप जिल्हा कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या नोंदणीची मुदत ३१ ऑगस्ट असून या योजनेचे अर्ज – अजूनही ज्या महिलांनी भरलेले नाहीत किंवा ज्यांनी मतदार नोंदणी केलेली नाही. अशा सर्व लातूर शहरातील महिला –पुरुष नागरिकांसाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची सुविधा महात्मा गांधी चौक येथील भाजपच्या जिल्हा कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेली आहे. या ऑनलाईन केंद्राबद्धल व मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबद्धल संपूर्ण माहिती असलेल्या चित्ररथा द्वारे शहरात मोफत ऑनलाईन नोंदणी केंद्राबद्धल जन जागृती करण्यात येतं आहे. हे चित्र रथ शहरभर फिरून ध्वनीक्षेपकाद्वारे लातूरकर बंधू भगिनीना मोफत ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. लातूर शहरातील बंधू भगिनींनी भाजपच्या सदर ऑनलाईन नोंदणी केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी केले आहे. यावेळी प्रवीण कस्तुरे, रवि सुडे, ऍड. दिग्विजय काथवटे, प्रवीण सावंत, शोभाताई पाटील, मीनाताई भोसले, संजय गिरी, आबा चौगुले, ललित तोषणीवाल, राहुल भूतडा, जमीर शेख, अबेद अली, प्रमोद गूडे, बालाजी मार्कडे आदिसह भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हरित लातूर निबंध स्पर्धेत सरस्वती विद्यालयाची अमरीन शेख जिल्ह्यात सर्वप्रथम

कुमठा (बु ):शिक्षण विभाग, जिल्हा परिषद लातूर तर्फे हरित लातूर निबंध स्पर्धा घेण्यात आली .या स्पर्धेमध्ये सरस्वती माध्यमिक विद्यालय कुमठा( बु)येथील इ. नववीतील विद्यार्थिनी कुमारी शेख अमरीन खाजासाब ही संपूर्ण लातूर जिल्ह्यातून सर्वप्रथम आली आहे. माझे झाड माझी जबाबदारी या विषयावर तिने निबंध लिहून हे यश प्राप्त केले आहे .या तिच्या सुयशाबद्दल संस्थाध्यक्ष श्री अशोकराव सांगवीकर, सचिव श्री डी. बी. लोहारे गुरुजी, मु. अ. श्री अशोकराव पेदेवाड, पर्यवेक्षक ए .पी. राठोड, गट साधन केंद्राच्या कामाक्षी पवार ताई, मार्गदर्शक डी. आर. जवळे ,वर्ग शिक्षिका एस .व्ही. बोरसुरीकर प्राध्यापक बी. एस. पटवारी ,एस .बी .मुंडे, यु. आर .कांबळे,व्ही.जी. पुठ्ठेवाड यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हार्दिक अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# पोलिसांना व कामगारांना राखी बांधून केशवराजच्या विद्यार्थ्यांनी जोपासली सामाजिक बांधिलकी



**लातूर / प्रतिनिधी-** दिनांक १९ रोजी शिवाजी चौकातील पोलिस स्टेशनमध्ये जाऊन पोलिसांना तसेच परिसरातील कामगारांना, मजुरांना विस्तार सेवा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी राखी बांधून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न केला. श्री. केशवराज माध्यमिक विद्यालयात संस्कृत दिन व राखी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री अथर्व टिंबे, प्रमुख उपस्थिती विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. संदीप देशमुख, श्री बबन गायकवाड, श्रीमती राजश्री कुलकर्णी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय, स्वागत व सूत्रसंचालन कु. कृतिका गंगावणे हिने केले. आभार कल्याणी देशपांडेनी व्यक्त केले. संस्कृत नाटिका चि.अक्षरा लटपटे, श्रीमयी सुगावकर, अदिती भांडे, हर्षवर्धन पाटील, प्रथमेश जवळचे यांनी सादर केली.तसेच संस्कृत दिन आणि राखी पौर्णिमेचे महत्त्व गार्गी सूर्यवंशीनी सांगितले. सामूहिक कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. हा सर्व कार्यक्रम संस्कृत भाषेत विद्यार्थ्यांनी सादर केला. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक श्री. महेश कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक श्री संदीप देशमुख, श्री बबन गायकवाड,श्रीमती राजश्री कुलकर्णी, कार्यक्रम प्रमुख श्री. राम जोशी, श्रीमती रीता सहस्त्रबुद्धे,श्री.प्रल्हाद माले,सहभागी अन्य शिक्षक व सर्व संस्कृत विषय शिक्षकांनी परीश्रम घेतले.

# चारित्र्यावर चरित्र अवलंबून आहे: ह. भ. प. श्री ज्ञानराज महाराज

**ॲड. शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी– माणसाचे जन्मापासून त्याच्यामागे कर्म हे लागलेले असते कर्माविना गतीच नाही माणूस जसे आचरण करील त्याचे चारित्र्य असेल त्यावर चरित्र अवलंबून असते म्हणून संस्कार नित्याचरण शुद्ध सात्विक वृत्ती हवी यासाठीच संतसंगती साधना उपासना महत्वाची आहे .

हाच अनुष्ठानाचा उद्देश आहे असे विचार ह भ प श्री ज्ञानराज महाराज यांनी व्यक्त केले. औसा येथील नाथ मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे पिठाधिपती सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या श्रावणमास अनुष्ठान मध्ये सायंकाळी नित्य चक्रीभजन सेवेनंतर ग्रंथराज ज्ञानेश्वरीतील अठराव्या आध्यायातील नवव्या श्लोकातील ओवी क्रमांक पाच सहा च्या निरूपणात महाराज बोलत होते.

आपण मागच्या निरूपणात मन वासना इच्छा क्रिया कर्म यावर चिंतन करण्याचा प्रयत्न केला जसे लेकीच्या बाबतीत तिला सासरी पाठवल्यानंतर तिच्याविषयी कसली अपेक्षा आसक्ती बाप ठेवत नाही तसे कर्माच्या बाबतीत अपेक्षित आहे हे तत्व माऊलींनी अनेक दृष्टांत आधारे आपल्याला उकल करून सांगितले आहे मुळात माणसांचा स्वतःच्या वर विश्वास हवा तेव्हाच तो इतरावर आणि देव भगवंत संतांवर विश्वास ठेवू शकेल स्वतःला कोण आहोत हे जाणून घेतल्याशिवाय संताला ओळखता येणार नाही. मनुष्याला क्रिया कर्म खूप महत्त्वाचे आहेत आपले आचरण कर्म क्रिया नित्यनेम चरित्र यावर आपले चरित्र ठरते चरित्र म्हणजेच त्या व्यक्तीचा इतिहास व जीवनाचा आराखडा असतो. यावेळी महाराजांनी एक वारकरी यांच्या संदर्भात



आळंदीच्या माऊली ज्ञानेश्वर यांच्या समाधी सोहळ्यातील एक कथा भाग अत्यंत सुंदरपणे सांगितला . माऊलींच्या समाधी सोहळ्यात काशीहून आलेल्या संताची भेट झाली नाही म्हणून जेव्हा काशीत कान्हा फाटक आळंदीहून जातात त्यावेळी ते संत लहान लेकरे आपली नातवंडं खेळवत बसलेले दिसले आणि नंतर नातवंडांना एक एक उचलून विहिरीत टाकून देत असल्याचे पाहून वारकरी चक्राऊन जातो , अरे आपण उगाच आलो हा कशाचा संत असा संभ्रम वारकऱ्यांच्या मनात उत्पन्न होतो पण जेव्हा ते त्या नातवंडांचे नावे घेऊन बोलवतात तर तेच विहिरीत बुडालेली मुलं पळत येतात मग त्या साधूची ताकद सामर्थ्य कळते.

तसेच सद्गुरु श्री. विरनाथ महाराज यांना ज्या हैबतबाबांनी आळंदीमध्ये नाथषष्ठीचा उत्सव करण्याला प्रतिबंध केला तेच हे बघ बाबा लोहगावला जेव्हा गिरनाथांनी जगद्गुरु संत तुकोबा यांच्या पादुका जमिनीतून बाहेर काढल्या आणि तिथे पादुका मंदिर भारले त्यावेळी त्यांच्या भेटीसाठी आवर्जून आले अर्थात संतांची ओळख संतांना सुद्धा कधी कधी होत नाही मग सामान्य प्रापंचिक माणसांना संत ओळखणे अवघड आहे हे त्यांनी या कथा भागाच्या आधारे स्पष्ट केले. निव्वळ वेशभूषेवरून साधू अथवा संत सत्पुरुष यांची ओळख पटत नाही त्यांचे सहवास त्यांच्या लीला यातून त्यांना ओळखावे लागते एकूण सद्गुणांची खाण असणाऱ्या संतांनी देव आपला केलेला असतो व तेच संत आपल्याला हा सन्मार्ग शिकवतात आणि उद्धारासाठी तळमळीने उपदेश करतात असे ज्ञानराज महाराज म्हणाले. रविवारी अरुण नागेश पोद्दार अर्थात बंडू पोद्दार रोहन चव्हाण डोंगरे ढाले प्रकाश वसंत महामुनी अंकुश माने खुणे बिराजदार डॉक्टर नरेंद्र पाटील आणि हसलगनकर माळी गुरुजी यांनी आपली माळ सेवा सद्गुरु चरणी रुजू केली.

# नित्यनेम नामस्मरणात राहाल तर लाईफ टाईम रिचार्ज व्हाल: ज्ञानराज गुरूबाबा महाराज

**ॲड. शाम कुलकर्णी**

लातूर : आपण संसाराच्या कर्मबंधनात अडकलो आहोत. पण यातून सुटका होऊन लाभलेले आयुष्य सुखी करायचे तर नित्यनेमाने नामस्मरण, गुरुसेवा, सत्संग करा, यामुळे आयुष्यभर रिचार्ज राहाल, एक ऊर्जा आपल्याला लाभेल, तीच विठ्ठल परमात्म्याच्या जवळ नेण्यास उपयोगी ठरेल, असा विश्वास सद्गुरू ज्ञानराज गुरूबाबा महाराज यांनी दिला. औसा येथे नाथ मंदिरात सद्गुरू गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या वार्षिक श्रावणमास अनुष्ठान अंतर्गत सायंकाळी नित्य चक्रीभजन सेवेनंतर ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या प्रवचनात ते बोलत होते.

श्रावणमास अनुष्ठान ज्ञानराज महाराज यांनी जटील विषय



सोपा करून सांगितला. मनुष्य म्हणतो संसारात सुख नाही. पण आपली सद्बुद्धी जागृत ठेवली आणि निर्मळ स्वच्छ मनाने आपले प्रपंच व्यवहार असतील तर हाच प्रपंच कसा आनंददायी ठरतो, याचे त्यांनी विवेचन केले.

ज्ञानेश्वर माऊलींनी संसारात परमार्थ कसा करता येतो, याचे तत्व आणि उपदेश केला की, ज्ञानेश्वरी आपण एकाग्र मनाने आणि श्रद्धेने वाचा, संसार आनंदी झाल्याशिवाय राहणार नाही, असे ते म्हणाले. एकीकडे संसार दुःख मूळ चोहीकडे इंगळ विश्रांती नाही, कोठे रात्रंदिन तळमळ हे म्हटले आहे, ते का तर आपला भगवंताठाई नसणारा विश्वास. मी पणा अहंकार, द्वेष, मत्सर, वाईट वासना लालसा, अविश्वास या गोष्टी संसारात दुःख ओढवून घेण्यात कारणीभूत ठरतात. हे दोष घालवण्यासाठीच आपल्याला संतसंग, गुरु सानिध्य लाभले पाहिजे, असे ज्ञानराज महाराज यांनी सांगितले.

# राखी पौर्णिमा उत्साहात साजरी

**लातूर / प्रतिनिधी:** रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला बाजारात राखी खरेदीसाठी महिलांची लगबग पाहायला मिळाली.

भाऊ-बहिणीचे नातेसंबंध जपणारा सण म्हणजे रक्षाबंधन. यासाठीच पारंपरिक राख्यांसोबतच मल्टिकलर लेसेस, कार्टून्स, डायमंड वर्क, फॅन्सी, मोती, स्टोन, गोंड्याच्या राख्या अशा विविध प्रकारच्या राख्या दोन रुपयांपासून चारशे रुपयांपर्यंत मिळत आहेत. त्यातही नाजूक व फॅन्सी राखीला प्राधान्य देण्यात येत आहे. मागील वर्षीच्या तुलनेमध्ये राख्यांचे भाव स्थिर असल्यामुळे खरेदीमध्ये उत्साह दिसून येत होता. लहान मुलांना आकर्षित करणाऱ्या विविध कार्टूनच्या राख्या देखील बाजारात उपलब्ध झाल्या आहेत. बाजारात रुद्राक्ष, मेटॅलिक डायमंड, नेकलेस, धागा, गोंडा, सिल्वर



मनी, यासह छोटा भीम, डोरेमॉन यांसारख्या विविध प्रकारच्या कार्टून राख्या देखील विक्रीसाठी आहेत. दरम्यान, आपल्या लाडक्या बहिणीला रक्षाबंधनचे गिफ्ट घेण्यासाठी गिफ्ट शॉपीमध्येही गर्दी दिसत होती. ज्वेलरी, पर्स, साडी, टॉप, फोटोफ्रेम, अशा गिफ्टला चांगली मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

## राज्यस्तरीय कृषी महोत्सव २०२४ चे आयोजन

लातूर, दि. १९ : २१ ते २५ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कॉटन मार्केट यार्ड नाथ रोड येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सव २०२४ आयोजित करण्यात आला आहे.

कृषी महोत्सवामध्ये कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, कृषी विद्यापीठे दालन, परिसंवाद , चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री केंद्र, विक्रेता , खरेदीदार संमेलन शेतकरी सन्मान समारंभ, सेंद्रिय शेतीमाल विक्री, रानभाजी महोत्सव, आधुनिक कृषी अवजारे प्रदर्शन, स्वंयसहाय्यता महिला बचत गट निर्मित वस्तू पदार्थांचे विक्री व प्रदर्शन असे विविध प्रकारचे स्वतंत्र दालन व चर्चासत्र आयोजित करण्यात आलेली आहेत. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व शेतकरी, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांनी राज्यस्तरीय कृषी महोत्सवामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर.टी. जाधव यांनी केले आहे.

# कळंब येथे शालेय लहुजी रत्न पुरस्काराचे वितरण

कळंब दि.१९ (प्रतिनिधी) - साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त इयत्ता १० वी व १२ वी मध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा ट्रॉफी, प्रमाणपत्र, स्कूल बॅग, शालेय साहित्य, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रातील १३ समाजसेवकांना 'लहुजीरत्न पुरस्कार २०२४ देऊन गौरविण्यात आले.

कळंब आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लहुजी शक्ती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विष्णू कसबे, आ. अमित गोरखे, भाजप पंचायत राज व ग्रामविकास विभागाच्या प्रदेश सहसंयोजक, भाजपच्या व श्रीलक्ष्मी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा डॉ सरोजनीताई संतोष राऊत, लहुजी शक्ती सेनेचे युवक प्रदेशाध्यक्ष सचिन क्षिरसागर, महिला प्रदेशाध्यक्ष मायाताई लोंढे, प्रदेश कार्याध्यक्ष युवराज जाधव, प्रदेश उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड, अमोल चव्हाण प्रदेश महासचिव



बालाजी गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना खंदारे म्हणाले की, मातंग समाजाचे प्रश्न संघटनेच्या माध्यमातून मांडले जातात. तर आता आ गोरखे हे विधानसभेत समाजाचे प्रश्न मांडत असल्याचे त्यांनी सांगितले. तर आ गोरखे यांनी संघटनेच्या कामाचे कौतुक केले. तसेच खंदारे यांनी सरकार समाजासाठी काय काम करते ? याचा पाढाच त्यांनी वाचला. तर डॉ. राऊत यांनी लहुजी वस्ताद साळवे व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्याविषयी सविस्तर माहिती सांगितली. तर श्रीलक्ष्मी बहुद्देशीय सेवाभावी संस्था व भाजपमध्ये सक्रीय सहभाग घेऊन पक्षाने दिलेली जबाबदारी व कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच


आजपर्यंत ग्रामविकास, पर्यटन विकास, सांस्कृतिक विकास, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, तिर्थ क्षेत्र विकास, अल्पसंख्याक विकास, रोजगार हमी, शेत रस्ते, ग्रामीण रस्ते आदी कामांना गती दिली. या माध्यमातून विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून कळंब धाराशिव मतदारसंघात नवनवीन विकास योजना, नवे विस्तारीकरण, पाणी टंचाई आदी योजना राबवून जवळपास ६० कोटीपेक्षा अधिक निधी उपलब्ध करून दिला असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमानंतर आ. गोरखे व डॉ. राऊत यांनी नागरिकांशी संवाद साधला.

# उत्तरादिमठात राघवेंद्र स्वामी पुण्यस्मरण महोत्सवाचे आयोजन

## २०,२१,२२ ऑगस्ट रोजी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

लातूर / प्रतिनिधी– दरवर्षी प्रमाणे याही वेळी श्री मध्व मंडळ व श्री उत्तरादिमठ यांच्या संयुक्त विद्यमाने ३५३ वा श्री राघवेंद्र स्वामी पुण्यस्मरण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विविध धार्मिक विधी सह प्रवचन, व्याख्यान आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री मध्व मंडळ व श्री उत्तरादिमठ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन २० ऑगस्ट रोजी उत्सव सोहळ्यास प्रारंभ होईल सकाळीं ६वाजता गद्य पठण,६.३० ते ७.३०वाजता सुक्त हवन,७.३० ते ८.३० अस्टोत्तर सेवा,प्रमुख पंडित रामकृष्णचार्य जोशी हलगरकर यांची तर ८.३० ते१०.३० भक्ती सेवा श्री शशी देशमुख व डॉ वृषाली देशमुख यांचा चमू यांचे भक्ती संगीत सेवा



SRI RAGHAVENDRA

होईल १०.३० ते ११.०० वाजता पंडित श्रीपाद आचार्य हल्गरकर यांचे प्रवचन होईल तर १० ते१०.३० पर्यंत तर माध्वशास्त्र संपन्न पंडीत अनंताचार्य काशीकर यांचे प्रवचन ११ ते१.३० पर्यंत त्यानंतर माध्व मंडळाचे अध्यक्ष जेष्ठ विधीज्ञ अँड श्रीराम(बळवंत) देशपांडे यांचे जीवन विकासातील टप्पे व सूत्रे या विषयवार व्याख्यान होईल त्यानंतर दुपारी १.३० वाजता महाआरती व महाप्रसाद नैवैद्य होईल १.४५ ते ३ महाप्रसाद वितरण होईल दुपारी ३ वाजता भजन, ६ ते७ वाजता पारायण व सायंसेवा,७ वाजता अष्टावधान सेवा आरती,रात्री ८ वाजता महामंगल आरती होईल.

२१, ऑगस्ट रोजी सकाळी मण्युसुक्त हवणर,आस्टोत्तर सेवा सकाळी ८.३० वाजता भक्ती संगीत सेवा पंडित शिवदासजी देगलूरकर व त्यांचा संच तर १०.३० ते ११.३०पर्यंत पंडित गोपीनाथ आचार्य तुळजापूरकर यांचे प्रवचन होईल तर दुपारी प्रवचन होतील सायंकाळी किरण भावठानकर व पंडित हरीश खंडेराव कुलकर्णी यांची संगीत सेवा होईल,२२ ऑगस्ट रोजी ८.३० वाजता परंमब्रम्ह संगीत विद्यालयाचे संच यांचे गायन होईल तर १०.३० वाजता श्री उत्तरादिमठाचे रघुत्तम आचार्य जोशी यांचे प्रवचन होईल दुपारी १.३० वाजता कार्यक्रमाचा समारोप होईल कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा न्यायालयातील सहाय्यक सरकारी वकील विठ्ठलराव देशपांडे , मध्व मंडळाचे अध्यक्ष अँड श्रीराम (बळवंत) देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होईल तर २.१५ ते२.४५ वाजेपर्यंत महाआरती नैवैद्य होईल ३ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसाद वितरण होईल .

या तिन्ही दिवसाच्या धार्मिक, संगीत, प्रवचन भजन पूजन कार्यक्रमाचा भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री उत्तरादिमठाचे पंडित रघुत्तमआचार्य जोशी मध्व मंडळाचे अध्यक्ष अँड श्रीराम देशपांडे, सचिव संजय राजहंस, किशोर कुलकर्णी मनोज देशपांडे प्रवीण देशपांडे हरीराम कुलकर्णी भानुदास भातांब्रेकर,बाळासाहेब देशपांडे,वसंतराव बेंडे, धनंजय कुलकर्णी,प्रवीण सौदती,ईश्वर कुलकर्णी, संयुक्ता राजहंस, मनीषा भातंबरेकर, पूजा जोशी,अमीता देशपांडे, नभा जोशी यांनी केले आहे.

# विरोधकांनी पसरवलेला नरेटिव्ह खोडून काढणार

लातूर/प्रतिनिधी : गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत खोट्या अफवा पसरून विरोधकांनी एक प्रकारचा नरेटीव सेट केला होता, त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला फटका बसला. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विरोधकांचा खोडसाळपणा चालू देणार नाही. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या वतीने येत असलेल्या योजना घराघरापर्यंत जाऊन जनसामान्य लोकांना समजावून सांगणार आहोत.

रविवारी (दि.१८) सकाळी संवाद लातूरकरांशी ही यात्रा काशी विश्वेश्वर मंदिरात दर्शन घेऊन सुरू झाली. त्यानंतर बोरगावकर क्लासेस समोर विशाल नगर, गगनविहार, शाम नगर,संग्राम नगर, विक्रम नगर, पद्मावती मंदिर या परिसरापर्यंत पोहोचली. केंद्र आणि राज्य सरकारने मिळून जनसामान्यांच्या हिताच्या अनेक योजना आणल्या आहेत. त्याचा जास्तीत जास्त लाभ गोरगरीब जनतेला मिळवून देण्यासाठी रॅली दरम्यान आम्ही जनजागृती करत आहोत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू झाली.



आतापर्यंत या योजनेचा लाभ हजारो माता भगिनींना झाला असून, जास्तीत जास्त या योजनेचा लाभ महिलांना मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.भारतीय जनता पार्टी महिलांचा विचार करते म्हणूनच आतापर्यंत महिलांच्या बँक खात्यावर रक्कम जमा झाली आहे. ही रक्कम महिला भगिनींच्या खात्यावर जमा करत असताना गैरप्रकार टाळण्यासाठी महायुती सरकारने जबाबदारी घेतली आणि थेट या योजनेचा लाभ महिला भगिनींपर्यंत पोहोचला.

लातूर शहराची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, लातूरकरांसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या समस्येकडे इथल्या लोकप्रतिनिधींचे लक्ष नाही. शहराचे प्रतिनिधी अत्यंत निष्क्रिय असून प्रशासन हे तोंडावर बोट ठेवून गप्प आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभेला भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराला निवडून दिल्यास लातूर शहराचा सर्वांगीण विकास आम्ही करणार आहोत असे त्यांनी सांगितले.दरम्यान या रॅलीसाठी भा.ज.पा सरचिटणीस दिग्विजय कायवटे जी भा.ज.पा. महिला मोर्चा लातूर शहर अध्यक्षा रागिणी यादव, मंडळ अध्यक्ष आबा चौगुले, संजय गिर, सुभाष ,, नारायण लोखंडे, युवा मोर्चा शहर जिल्हा उपाध्यक्ष काकासाहेब चौगुले, श्री.हेमंत जाधव ,सतीष ठाकुर, श्री.भरत भोसले, श्री.विजयकुमार कोळी सर, श्री.बोरगावतर जी, श्री.रमेश वसाळे,मंडळ सरचिटणीस लक्ष्मीकांत खरटमोल, विश्वजीत पाटील कव्हेकर, महीला मोर्चा शहर अध्यक्षा जयश्री धूत्तेकर, युवा मोर्चा माजी शहर जिल्हाध्यक्ष गौरव मदने, भाजपा शहर उपाध्यक्ष किशोर जैन, रमाकांत बाराटे, भेटके विमुक्त आघाडी शहर जिल्हाध्यक्ष नवनाथ ढेकरे, ॲड. शीतल पाटील, ऍड. गणेश गोजमगुंडे, सागर घोडके, संतोष तिवारी, पंकज देशपांडे, आकाश पितले, मंदार कुलकर्णी, योगेश गंगाणे, हृषिकेश क्षीरसागर, आदित्य आकांगिरे।, अभिजीत उन्हाळे, योगेश झिंजोटे, लक्ष्मण मोरे आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यशवंत धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# राष्ट्रवादी अल्पसंख्याक शहराध्यक्षपदी शहा बर्फीवाले

परंडा दि.१९ (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टीच्या अल्पसंख्यांक विभागाच्या परंडा शहराध्यक्षपदी जिशान शहा बर्फीवाले यांची निवड करण्यात आली.

बर्फीवाले यांची निवड खा सुप्रिया सुळे, खा अमोल कोल्हे, एसटी महामंडळाचे माजी अध्यक्ष जीवनराव गोरे, माजी आमदार राहुल मोटे, प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष संदीप जी पाटील, ॲड देवकते, ॲड सुभाष वेताळ, रणजीत मोटे, तात्यासाहेब गोरे, महादेव खैरे, प्रदेश सचिव नसीर शहा बर्फीवाले सामाजिक न्याय विभागाचे राहुल बनसोडे, शहराध्यक्ष श्रीहरी नाईकवडी, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष नंदकुमार शिंदे, गणीभाई हावरे, काळे, युवक शहराध्यश खय्युम तुटके, शहर उपाध्यक्ष अरबाज पठाण, शहर प्रसिद्धी प्रमुख गोरख देशमाने, शहर उपाध्यक्ष आरिफ मुजावर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी कटिबद्ध – डॉ. पाटील

## डोळे तपासणी व फिजिओथेरपी शिबीरास प्रतिसाद



धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – आपल्या भागातील नागरिक हे अनेक आजार अंगावर काढतात त्यामुळे या आजारावर योग्य वेळी जर उपचार झाले तर तो मोठ्या आजारापासून तो दूर राहतो. मात्र योग्य वेळी उपचार न झाल्यामुळे तो आजार मोठा होत जातो. त्यामुळे आम्ही नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे या हेतूने आरोग्य शिबिरांचे आयोजन करीत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस डॉ.प्रतापसिंह पाटील यांनी केले.

वाशी तालुक्यातील पारा येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या डोळे तपासणी चष्मे वाटप औषध वाटप व फिजीओथेरपी तपासणी शिबिराचे उद्घाटन डॉ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या शिबिरात ५०० गरजू रुग्णांनी याचा लाभ घेतला. या आरोग्य शिबिरास मनिष भराटे, शैलेश पाटील, अतुल पाटील, उमेश चौधरी, धनंजय जामदार, अंकुश फूरडे, शशिकांत टाचतोडे, राजेश शिंदे, सुरेश ढेंगले, सूरज शिंदे, कृष्णा शिनगारे, विकास शिनगारे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.प्रतापसिंह पाटील म्हणाले की,आरोग्य शिबिरामुळे छोट्या छोट्या व्याधीवर देखील योग्य वेळी उपचार होतात. मी स्वतः डॉक्टर असल्यामुळे 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' हे ब्रीद वाक्य घेऊनच मी आतापर्यंत काम करत आलेलो आहे व यापुढे देखील करत राहील. या शिबिराच्या यशस्वितेसाठी डॉ.पूजा आचार्य, डॉ.कैलास अडसुळे, डॉ.गणेश गोरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी घाडगे यांनी तर आभार राजेंद्र टाचतोडे यांनी मानले. यावेळी पारा व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वडीलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ शाळेस कमान भेट देऊन नवीन पाडला पायंडा

मुरुम दि.१९ (प्रतिनिधी) – तालुक्यातील केसरजवळगा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी आपले वडील दिवंगत प्रल्हाद अंबाजी गायकवाड यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ शाळेस सुंदर अशी भव्य कमान भेट देऊन नवीन पायंडा घालणारे नवतरुण उद्योजक विशाल गायकवाड व त्यांच्या सहचारिणी शितल गायकवाड यांच्यातर्फे शाळेस मोठी भेट दिल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

या शाळेची स्थापना सन १८८५ ची असून गेल्या चार वर्षापासून शिक्षक, गावकरी, ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने शाळेला विविध प्रकारच्या सेवासुविधा पुरविल्या जात आहेत. आजपर्यंत सहा लाखापेक्षा अधिक किंमतीच्या वस्तू शाळेस प्राप्त झाल्या आहेत. या अगोदर मल्लीनाथ तोरणगे यांनी शाळेस गेट भेट दिल्याने शाळेस कमानीची अत्यंत गरज होती. ती गरज ओळखून विशाल गायकवाड परिवाराने ३५ हजार रूपये खर्च करून भव्य कमान शाळेस भेट दिली. देशाचा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा होत असताना शाळेस अनोखी भेट देऊन आपल्या वडीलांच्या स्मृती नेहमीसाठी तेवत राहाव्यात अशा हेतूने त्यांनी ही भेट दिल्याचे सांगितले. यावेळी ताराबाई प्रल्हाद गायकवाड व गायकवाड कुटुंबीयांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच पूजा पटवारी, उपसरपंच अजहर इनामदार, ग्रामविकास अधिकारी गोरख हलबुर्गे, अध्यक्ष नाजीम शेख, वैजनाथ कंटेकूरे आदींची उपस्थिती होती. माजी सैनिक जयपाल राजपूत, उपक्रमशील शिक्षक बालाजी भोसले, माजी सरपंच अमोल पटवारी, मुख्याध्यापक नबीलाल शेख आदींनी पुढाकार घेतला. यावेळी सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संविधानाचे संरक्षण करणारा सक्षम व दूरदृष्टीचा बलशाली उमेदवार असावा – भंडारे

नळदुर्ग दि.१९ (प्रतिनिधी) – भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हे मानवी मुल्य सर्व भारतीय नागरिकांना देऊन समानता प्रस्थापित करुन विषमता नष्ट केली. सत्तेच्या व बहुमताच्या जोरावर काही सत्ताधारी, राजकारणी , संविधान विरोधक यांनी संविधानाने दिलेल्या सामाजिक अधिकार , शिक्षण व नोकरीतील आरक्षण इत्यादीमुळे मिळालेले अधिकार ,उच्च पदे घालऊन पूर्वीप्रमाणे चातुर्वर्ण्य लागू करण्यासाठी २०२४ मध्ये संविधान बदलण्याचा , आरक्षण मुक्त भारत करण्याचे विरोधकांचे काम चालू आहे. त्यामुळे आरक्षण समर्थकांनी संविधान बदलू नये म्हणून सक्षम उमेदवार निवडून आला पाहिजे. तो भारतीय संविधानाचा कवच म्हणून तत्पर तयार असायल हवा छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर या महामानवांच्या समतावादी विचार धारेच्या संविधान समर्थक जनतेने बहुजन समाजातील प्रत्येक घटकातल्या मानसाला कळायला हवं उमेदवार सक्षम व दूरदृष्टीचा बलशाली आसायला हवा तरच बाबासाहेबांच्या संविधानाकडे कुणाची बघण्याची हिम्मत करणार नाही आसे परखड मत भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे प्रमुख जनरल एस.के. भंडारे यांनी केले .

उमरगा येथे भारतीय बौद्ध महासभेची जिल्हा कार्यकरणी तथा जिल्ह्यातील आंबेडकर प्रेमी जनतेची महत्व पुर्ण बैठक संपन्न आयोजित करण्यात आले होते. त्या वेळेस ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष सुरवसे तर प्रमुख पाहुणे भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षा विजयमाला धावारे, जिल्हा सरचिटणीस विद्यानंद वाघमारे, जिल्हा कोषाध्यक्षा राजश्रीताई कदम, जिल्हा पर्यटन विभाग उपाध्यक्ष विश्वास पांडागळे, जिल्हा कार्यालयीन सचिव दादासाहेब बनसोडे, वंचितचे रामचंद्र गायकवाड, आर.पी. आयचे हरिष डावरे, एस.के. चेले, बसापाचे चंद्रकांत कांबळे, सेवा निवृत्त मुख्याध्यापक कैलास गवळी, ड पांढरे, अविनाश भालेराव, राजेंद्र सुर्यवंशी, मविआचे दिग्विजय शिंदे, पत्रकार दिलीप सुरवसे, झुंबर गायकवाड, सारीका कांबळे, लता कोल्हे, अरुणा सुर्यवंशी, जिवन सुर्यवंशी, किरण कांबळे,आकाश गंभीरे, दयानंद कांबळे, दिलीप गायकवाड, बलभिम गायकवाड, जालिंदर कांबळे यांच्यासह बौद्ध उपासक, उपासिका



व समता सैनिक दलाचे सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उमरगा विधानसभा उमेदवार समन्वय समिती गठीत करण्यात आली. यामध्ये ड हिराजी पांढरे, चंद्रकांत कांबळे, रामचंद्र गायकवाड, विक्रांत सुर्यवंशी, ब्रम्हानंद गायकवाड, विद्यादेवी कांबळे, उषा गायकवाड, लता कोल्हे, बाबासाहेब जानराव, विद्यानंद वाघमारे, अकारा गंभीरे, जीवन सुर्यवंशी, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप कांबळे यांनी तर आभार किरण कांबळे यांनी मानले.

# गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील – वैद्य दुधाळ

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – गोवंशाच्या जतन आणि संवर्धनासाठी गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा देण्यासाठी आपण प्रयत्नशील असून जिल्हा, तालुका व गाव पातळीवर गोरक्षण समित्यांची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा गोसेवक वैद्य नवनाथ दुधाळ यांनी केली.

कळंब तालुक्यातील दुधाळवाडी (पांडववाडी) येथे वैद्य नवनाथ दुधाळ यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१५ ऑगस्ट रोजी गोसंसद व जिल्हास्तरीय बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते दुधाळ बोलत होते. यावेळी सोलापूर येथील ज्येष्ठ गोसेवक विलासभाई शहा, गोसांसद स्वामी इंजेलियन, सुवर्णा यादव, हभप अरुण शाळू महाराज, अंबादास देशपांडे, शहाजी जाधव, खंडेश्वर लोकरे, आप्पा खरडकर, बाळासाहेब दुधाळ, अकबर शेख, रघु मीर, औदुंबर अवधूत, गुरुनाथ दुधाळ, बालाजी लाटे, अभंग गंगथडे, बाळू कांबळे, अमोल चव्हाण आदी उपस्थित होते. पुढे बोलताना दुधाळ म्हणाले की, जगद्गुरु शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांच्या अधिपत्याखाली पाच दिवसीय गोसंसद नुकतीच नवी दिल्ली येथे पार पडली. यामध्ये आपण गोसंसद पदाची शपथ देऊन मंत्रिमंडळामध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यानंतर धाराशिव जिल्ह्यासह राज्यभरामध्ये गोवंश जतन आणि संवर्धन करण्यासाठी दुधाळ यांनी चळवळ उभी केली आहे. त्याअनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्रातील गावागावात जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर गोरक्षण समित्यांची स्थापना करण्यात येत आहे. इच्छुक गोरक्षकांनी आपापल्या गावात समित्यांचे गठण करुन कार्यकारिणीची यादी आपल्याकडे द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. त्याचबरोबर संपूर्ण देशामध्ये गोहत्या बंदी कायद्याची अंमलबजावणी व्हावी,गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा,गो संवर्धनासाठी प्रत्येक गाईंना प्रतिदिन १०० रुपये प्रमाणे ३ हजार रुपये महिना शासनाकडून मानधन मिळावे, गोवंशाच्या निर्मित उत्पादनावरील जीएसटी बंद करण्यात यावी, गायरान जमिनीचा वापर गोवंश चार्यासाठी उपलब्ध करून देण्यात यावा, यासह अन्य इतर विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. यापुढे



गायींना प्रती दिन १०० रुपये अनुदान मिळणार असल्यामुळे यापुढे गायी कत्तलखान्यास जाण्यापासून वाचतील. गोरक्षणाच्या विषयावर आम्ही लोकसभा निवडणूक लढविली. अपेक्षित मतदान मिळाले नसले तरी गोमातेच्या संरक्षणाचा विषय आम्ही जनतेसमोर मांडला. आगामी विधानसभा निवडणुकीत इच्छुकांनी गोरक्षणाच्या प्रश्नावर निवडणूक लढवावी. त्यासाठी सर्व गोरक्षक आपल्या पाठीशी उभे राहतील, असेही त्यांनी सांगितले. या गोसंसद आणि जिल्हास्तरीय बैठकीस धाराशिवसह लातूर, बीड, नांदेड, परभणी, सोलापूर, सातारा, सांगली कोल्हापूर, पुणे, मुंबई, ठाणे, नगर जिल्ह्यातील गोरक्षक व गोसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नळदुर्ग बौद्ध नगरमध्ये नवीन पाईप लाईन जोडणीला सुरूवात

नळदुर्ग दि.१९ (प्रतिनिधी) – बोरी धरण अन् उशाला कोरड पडली घशाला....या म्हणी प्रमाणे दर आठ दिवसाच्या नंतर नागरिकांना पाणी पुरवठा होत होता. परंतू गेल्या अनेक वर्षांपासून नळदुर्ग शहरासाठी पाण्याच्या टाकीची क्षमता कमी असल्याने हे नळदुर्गकरांवर पाणी टंचाईची वेळ आली होती. आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्गचा चेहरा मोहरा बदलत नळदुर्गला पाणी ही मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यांनी ४३ कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा योजनेचे आ पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. तर तात्काळ नळदुर्ग शहरातील बौद्धनगर भागात मुळे प्लॉटिंगमध्ये जलद गतीने सुरूवात झाली आहे. पाणी पुरवठा पाईप लाईन जोडणी चालू झाली असून प्रत्येक गल्लीत, बोळात व घरापर्यंत सब पाईपलाईन मिळणार आहे. प्रत्येकाला नागरिकाला पिण्याच्या पाण्याची सोय उत्तम प्रकारे मिळणार आहे. यामुळे नळदुर्गमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. नगर नगर परिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पाणी पुरवठा अभियंता दीक्षा सिरसट, नगर अभियंता



वैभव चिंचोले, पाणी पुरवठा कर्मचारी फुलचंद सुरवसे, जनार्धन कांबळे, कन्सल्टंट अभियंता अजयकुमार बागडे, साईट अभियंता इमरान गौर, अण्णा जाधव, सहाय्यक अभियंता तानाजी गायकवाड आदींनी संबंधित सर्व रस्त्याची पाहणी केली असून या पाहणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नागरीकानी अभिनंदन व कौतुक केले. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक गुरुनाथ मुळे, सामाजिक कार्यकर्त्या मधुशीला बागडे, धनराज मुळे, सुनील मुळे आदींसह नागरिक उपस्थित होते.

# राया वाटलं होतं तुम्ही यालऽऽ..., विचार काय हाय तुमचा..

# नृत्य कलाकारांसह रसिकांनीही धरला लावणीवर ठेका









धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – राया वाटलं होतं तुम्ही यालऽऽ.., विचार काय हाय तुमचा हो पावणं.. या प्रसिध्द लावण्यांसह तुझ्यासाठी आले वनात.... या गवळण गीतांवर नृत्य कलाकारांसह रसिकांनी ठेका धरून जल्लोष केला. रसिकांनी नृत्य कलाकारांना टाळ्या, शिट्ट्या आणि वन्समोअरचा आग्रह धरून त्यांच्या कलेला मन भरून दाद दिली. निमित्त होते शंभराव्या नाट्य संमेलनानिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या धाराशिव शाखेच्यावतीने आयोजित सांस्कृतिक महोत्सवाचे.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात १५ ते १८ ऑगस्ट दरम्यान सांस्कृतिक महोत्सव सुरू आहे. महोत्सवाच्या तिसर्या दिवशी १७ ऑगस्ट रोजी सुगम संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते नटराजाचे पूजन करून व सिने अभिनेते दिवंगत विजय कदम यांना श्रध्दांजली वाहून उद्घाटन करण्यात आले.

यावेळी महोत्सवाचे स्वागताध्यक्ष धनंजय शिंगाडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद कार्यकारिणी सदस्य विशाल शिंगाडे, तेजस्विनी कदम, यतीराज वाकळे, नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, मुंबई विद्यापीठातील लोककला विभागाचे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे, अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष अनंत जोशी, उपजिल्हाधिकारी शोभा जाधव , जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे उपस्थित होते.

पारंपारिक लावणी महोत्सवात लावण्यवती तनुजा शिंदे (लातूर), अंकिता माने, अपर्णा पवार, अंबिका आगळे, निकिता साळुंके, दिशा सोनटक्के, रिया राठोड, प्रतिक्षा गुंडरे, शुभम खोत, किरण कोरे श्रावणी हराळकर, पवन चव्हाण (अहिल्यानगर), आदिती केंद्रे (नांदेड) निकिता साळुंके आदींनी एकापेक्षा एक पारंपारिक लावणीनृत्य सादर केले.

यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद च्या वतीने सहभागी कलाकारांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तनुजा शिंदे हिने राजसा विडा रंगला ओठी, श्रावणी हराळकर हिने कचकच कांदा, दिशा सोनटक्के हिने घ्याल का हो राया एक शालू बनारसी, प्रियंका पोतदार हिने राया वाटलं होतं तुम्ही याल, पवन चव्हाण याने तुझ्यासाठी आले वनात, किरण कोरे याने बाई गं पिचली माझी बांगडी, शुभम खोत याने विचार काय हाय तुमचा हो पावणं अशा एक से बढकर एक लावणी गीतांवर नृत्य सादर करून उपस्थित रसिकांना खिळवून ठेवले. कलाकारांच्या या सादरीकरणाला रसिकांनी शिट्ट्या, टाळ्या आणि वन्समोअरने दाद दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशाल शिंगाडे यांनी तर सूत्रसंचालन सतीश ओव्हाळ यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्चना टिळक, सुगत सोनवणे,सागर चव्हाण उपाध्यक्ष (उपक्रम),शरणम शिंगाडे, सल्लागार राजेंद्र अत्रे, डॉ. अभय शहापूरकर, सदस्य धनंजय कुलकर्णी, दयानंद साबळे, सुरेश देवकुळे, प्रमोद जोगदंड, श्रीकांत साठे, अर्जुन धावारे, विशाल टोले, भैरू कदम,प्रसेनजित शिंगाडे, ताहेर शेख, दिग्विजय शिंगाडे, शुभम खोत, विजय उंबरे, सुमित शिंगाडे, विश्वनाथ काळे, सुमेध चिलवंत, ऋषीकेश गवळी, यशवंत शिंगाडे, संकेत नागणे, अक्षय दिवटे, सौरभ शिंगाडे, प्रविण सोनवणे, प्रसाद वाघमारे, प्रज्ञावंत ओहाळ, प्रशांत कांबळे, सारिपुत शिंगाडे यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

## संपादकीय

# एक देश, एक निवडणूक ते समान नागरी कायदा

देशाच्या कानाकोपऱ्यात भारताचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. १५० वर्षांहून अधिक काळ ब्रिटिशांची गुलामगिरी सहन केल्यामुळे मिळालेल्या स्वातंत्र्याचा आणि स्वातंत्र्यानंतरच्या ७७ वर्षांमध्ये देशाने केलेल्या प्रगतीचा प्रत्येक भारतवासीयाला अभिमान आहे. त्यामुळे या दिवशी देशवासीयांना खरी उत्सुकता असते, ती राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्यावरून पंतप्रधान करत असलेल्या भाषणाची. या भाषणातून देशासमोरील आव्हाने, देशाची प्रगती, अडचणी, देशाची होत असलेली वाटचाल आदी सर्वांची छोटेखानी रूपरेषा समजण्यास मदत होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग अकरा वेळा लाल किल्ल्यावरून ध्वजारोहण केले. गेल्या अनेक वर्षांपासून देशभरात बहुचर्चित असणाऱ्या समान नागरी कायद्याबाबत पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणातून उल्लेख केला. देश विविध राज्यांमध्ये, जाती-धर्मांमध्ये विखुरला गेला असला तरी आजच्या परिस्थितीत देशाला सांप्रदायिक नव्हे, तर धर्मनिरपेक्ष नागरी संहितेची गरज असल्याचे मोदींनी स्पष्ट केले. देशाला धर्मनिरपेक्ष नागरी संहिता आवश्यक असल्याचे सांगताना धर्माच्या आधारावर होणाऱ्या भेदभावापासून आपण मुक्त होऊ. यूसीसी लागू करण्याबाबत भाजपा सातत्याने बोलत आहे. मार्च महिन्यात भाजपशासित उत्तराखंडमध्ये यूसीसी लागू करण्यात आली. अशाप्रकारे समान नागरी संहिता लागू करण्यात आलेले हे देशातील पहिले राज्य ठरले असल्याचा उल्लेखही मोदी यांनी केला. कायद्याला धर्माच्या नावाने विभाजित करत असेल त्याला दूर केले पाहिजे. आपल्या देशात सुप्रीम कोर्टाने अनेकदा यूसीसीबाबत चर्चा केली. त्यावर आदेशही दिलेत कारण देशातील एक मोठ्या वर्गाला असं वाटतं आपण जगत असलेली नागरी संहिता प्रत्यक्षात धार्मिक आणि भेदभावपूर्ण आहे. जो कायदा धर्माच्या आधारे विभाजन करतो, उच्च, कनिष्ठ याचे कारण बनतो. त्या कायद्यांना आधुनिक समाजात स्थान असू शकत नाही. आता देशात धर्मनिरपेक्ष नागरी संहिता असावी अशी देशाची मागणी आहे. युनिफॉर्म सिव्हिल कोड म्हणजेच समान नागरी कायदा जो सर्व धर्मासाठी एकच कायदा लागू असेल. सोप्या भाषेत एक देश, एक कायदा.

सध्या सर्व धर्मांसाठी वेगवेगळे कायदे आहेत. समान नागरी कायदा येताच सर्वांसाठी एकच कायदा लागू असेल. मग तो कुठल्याही धर्माचा, जातीचा का असेना. सर्वोच्च न्यायालयानेही त्यांच्या अनेक खटल्यांमध्ये समान नागरी कायद्याची गरज का आहे हे स्पष्ट केले आहे. हिंदू, शिख, जैन, बौद्ध यांचे वैयक्तिक खटले हिंदू विवाह कायद्यानुसार चालतात. मुसलमान, ईसाई, पारसी यांच्यासाठी पर्सनल लॉ आहेत. जर यूसीसी देशात आणला तर सर्व धर्मांचे वैयक्तिक कायदे रद्द होतील. पंतप्रधान मोदींनी पुन्हा एकदा वन नेशन, वन इलेक्शनच्या गरजेवर भर दिला. देशातील जनता, राजकीय पक्ष आणि संविधान जाणणाऱ्या लोकांनी वन नेशन, वन इलेक्शन या संकल्पनेसाठी पुढे आले पाहिजे, असे आवाहन यावेळी पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांना केले. डिझाईन इंडिया' ते सेक्युलर सिव्हिल कोड' या सर्वांचा आढावा पंतप्रधानांनी आपल्या भाषणातून घेतला. आपल्या देशातील महागड्या वैद्यकीय शिक्षणामुळे अनेक पालक कर्ज काढून मुलांना परदेशातील वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत आहेत. यासाठी त्यांचे लाखो-करोडो रुपये खर्च होतात. सुमारे २५,००० तरुणांना प्रत्येक वर्षी मेडिकलच्या शिक्षणासाठी परदेशात जावे लागते. त्यामुळे गेल्या १० वर्षांत आम्ही मेडिकलच्या जागा वाढवून त्या १ लाख केल्या. त्यामुळे आम्ही हे निश्चित केले आहे की, येत्या पाच वर्षांत मेडिकल क्षेत्रात ७५,००० नव्या जागा तयार केल्या जातील, असे पंतप्रधानांनी देशवासीयांना सांगितले. भारत जगात आपल्या उत्कृष्ट दर्जाच्या वस्तू आणि सुविधांसाठी ओळखला जाईल. यासाठी डिझाईनिंग इंडियावर भर द्यायचा आहे. त्यासाठी इंडियन स्टँडर्ड हे इंटरनॅशनल स्टँडर्ड बनावे हे आपले लक्ष्य असावे. यासाठी डिझाईनिंग इंडिया आणि डिझाईनिंग फॉर वर्ल्डवर आपला फोकस असायला हवा. गेमिंगचे जग आज वेगाने विकसित होत आहे. मला वाटते की, भारताची मुले, भारतातील तरुणांनी आयटी, एआय प्रोफेशनल गेमिंगच्या जगात आपले नाव करावे. ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी, उत्पादित मालाला देशातच बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी पंतप्रधान मोदींनी यावेळी पुन्हा वोकल फॉर लोकल' हा मंत्र दिला. लोकलसाठी व्होकल हा आर्थिक व्यवस्थेचा नवा मंत्र बनला आहे. प्रत्येक जिल्ह्याला आपल्या उत्पादनांचा अभिमान वाटू लागला आहे. एक जिल्हा एक उत्पादन' हा तो मंत्र आहे. देशवासीयांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी यांनी राजकारणातील घराणेशाहीचा समाचार घेतला. घराणेशाही आणि जातिवादामुळे लोकशाहीला मोठा धोका आहे. यापासून देशाला मुक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. यासाठी एका महत्त्वाकांक्षी मिशननुसार ज्यांना कुटुंबातील राजकीय पार्श्वभूमी नाही, अशा तरुणांना राजकारणात आणायचे आहे. यामुळे देशाला घराणेशाही आणि जातिवादातून मुक्ती मिळेल आणि नवी विचारधारा पुढे येईल, हे तरुण कोणत्याही पक्षात जाऊ शकतात. यावेळी ऑलिम्पिक खेळांचा, स्पर्धेचा व देशाला मिळालेल्या यशाचाही पंतप्रधानांनी आढावा घेत २०३६च्या ऑलिम्पिकचे आयोजन भारताने करावे, अशी इच्छा व्यक्त केली. खेळ, रोजगार, विकास, कायदे, शेतकरी, खेळ आदी सर्वच स्थरावर मोदींनी आपल्या भाषणातून आढावा घेत देशाची पुढील वाटचाल व भूमिका स्पष्ट केली.

# करदात्यांनो फसव्या ईमेल्सपासून सावधान

गुगल, याहू, वगैरे कंपन्या अशा प्रकारच्या मेल्स थेट स्पॅम'मध्ये टाकतात. तरीही अशा प्रकारची एखादा मेल आपल्या इनबॉक्समध्ये आलाच तर तिची स्पॅम' म्हणून नोंद करता येते आणि भविष्यात या ठिकाणाहून येणाऱ्या मेल्स स्पॅम' फोल्डरमध्ये जाऊन पडतात. या फोल्डरमधल्या मेल्स साधारणत: ३० दिवसांनी आपोआप डिलीट केल्या जातात. संबंधित खात्याकडे संशयास्पद ईमेल्सची तक्रार करावी. त्यामुळे हे खाते सर्वांना सावध करेल. हे सर्व आपल्यापुरते न ठेवता इतरांनाही सावध करा, त्यांनाही एक जागरूक ग्राहक बनवा.



३१ मार्च, २०२४ उलटल्यानंतर करदात्यांची लगबग चालू झाली ती आयकर विवरणपत्रासाठी लागणारी वेगवेगळी माहिती गोळा करण्याची आणि ३१ जुलै, २०२४ या अंतिम तारखेआधी विवरणपत्र दाखल करण्याची. आता लगबग चालू आहे ती आयकर खात्याची आणि त्यांच्या प्रणालीची. काही करदात्यांना आपल्याला आणखी कर भरावा लागणार आहे का?', आयकर खाते काही त्रुटी काढून कारणे दाखवायला सांगेल का?'अशी काहीशी चिंता असते. तर काही करदाते आपला कर परतावा कधी आपल्या खात्यात जमा होणार त्याची वाट पाहत असतात. करदात्यांच्या याच मनस्थितीचा फायदा सायबर चाचे घेतात आणि काहीना काही शक्कल लढवून अगदी खऱ्या वाटणाऱ्या ईमेल्स त्यांना पाठवतात.

हा मेल वाचा-एका महिलेला मेल आला की, काही तांत्रिक अडचणींमुळे तिने करापोटी भरलेली रक्कम आयकर खात्याकडे जमा होऊ शकली नाही, तरी खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करून परत एकदा कर भरावा. ती महिला दक्ष असल्याने तिने तो मेल कोणाकडून आलाय ते तपासून पाहिले आणि तो मेल फसवा असल्याचे तिच्या लक्षात आले. मग तिने ताबडतोब तो ईमेल आयडी ब्लॉक केला. अन्य एका मेलमध्ये म्हटले होते की, तुम्हाला ३१ हजार रुपयांच्या आयकर परतावा मंजूर करण्यात आला आहे. पण तुमच्या बँकेचा तपशील आमच्याकडे मिळत नसल्याने आम्ही तो तुम्हाला देऊ शकत नाही.' या महाशयांनी आपली सर्व माहिती समोरच्या व्यक्तीला उघड केली आणि बँकेतली शिल्लक गमावून बसले. खरे तर आपण भरलेला कर किंवा मिळणारा परतावा आयकर खात्याच्या संकेतस्थळावर दिसतो. हे आपल्याला जमत नसेल तर ज्या कर सल्लागारामार्फत आपण आपले विवरणपत्र दाखल करतो, त्याला विचारावे. म्हणजे फसगत होणार नाही.

आयकर खात्याकडून आल्यासारख्या वाटणाऱ्या फसव्या ईमेल्सची संख्या खूपच जास्त आहे. कारण अगदी साधे आहे की करदाते अशा मेल्सना घाबरून काहीतरी भलतेच करून बसतात. हे केवळ आयकराबाबतच घडते असे नाही, तर जीएसटी, कस्टम्स, यांच्या नावानेही फसव्या ईमेल्स येतात. कर भरायची शेवटची तारीख जसजशी जवळ येऊ लागते, तसतसे अशा ईमेल्सचे प्रमाण वाढते.

जोडीला पोलीस, सरकारी खाती, बड्या कंपन्या, यांच्याकडून आल्यासारख्या वाटणाऱ्या ईमेल्सची संख्याही मोठी आहे. अत्याधुनिक संगणकीय तंत्रज्ञानामुळे या सर्वांचे जे एक विशिष्ट चिन्ह अथवा प्रतीक असते ते जसेच्या तसे वापरता येऊ शकते. शिवाय अशा ईमेल्सच्या शेवटी एखादे नाव आणि त्याचा हुद्दा लिहिला असतो; तोही अशा पद्धतीने की वाचणाऱ्याला वाटावे की, बापरे एवढ्या मोठ्या पदावरील माणसाने मेल पाठवली आहे, म्हणजे खरी असणार. सायबर चाचे फसव्या ईमेल्सचा उपयोग एखाद्याचा पासवर्ड, क्रेडिट कार्डाचा तपशील, बँक खात्याचा तपशील, अशी गोपनीय माहिती अलगद काढून घेण्यासाठी अतिशय प्रभावीपणे करतात. तंत्रज्ञान कोळून प्यायलेले हे चाचे अगदी हुबेहूब वाटणारे संकेतस्थळही बनवतात. हे मूळ संकेतस्थळाच्या शीघ्र शी साधर्म्य असणारे पण एखादा सूक्ष्म बदल केलेले, तसेच https:// या सुरक्षित साधनाचा वापर केलेले नवीन संकेतस्थळ असते.

url म्हणजे कोणत्याही संकेतस्थळाचा पत्ता आणि https:// म्हणजे सर्वांना माहीत आहेच की, सुरक्षित संकेतस्थळ. समजा मूळ संकेतस्थळ https:// abcbank-ltd असे असेल, तर यात थोडासा बदल करून https://bcbank. ltd असे संकेतस्थळ बनवले जाते किंवा मूळ a मध्ये असा बदल केला जातो. आपण ज्या फसव्या ईमेलला उत्तर द्यायच्या मनस्थितीत असतो, ती ईमेल आपल्याला या बनावट संकेतस्थळावर घेऊन जाते आणि साहजिकच आपल्याला वाटते की, यावर विश्वास ठेवायला हरकत नाही.

मात्र जशी छपाईमध्ये चूक होते, एखादी बातमी चुकीच्या पद्धतीने छापली जाते, तशीच चूक हे चाचेही करतात. ईमेल जीएसटी खात्याकडून आलेला असतो, पण मेसेज आयकरासंबंधी असतो. ईमेल आयडी खोटे दिले जातात. इंग्रजी भाषाही नीट वापरलेली नसते. अर्थात जो फसतो, तो इतके सर्व काही पाहत नाही. त्या मेलद्वारे घातलेली भीती, मग ती अमुक एका तारखेआधी इतका कर भरा, अन्यथा दंड भरावा लागेल, अशी असो की, इतक्या दिवसांत रक्कम न भरल्यास पोलीस कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी असो. वाचणारा घाबरायला हवा. आणखी दोन दिवसांनी अशा मेल्सवर आपण काही कृती करायला गेलो, तर ती संकेतस्थळे गायब झालेली दिसतात, म्हणजेच चाचे निदान काहीजणांना फसवण्यात तरी यशस्वी झालेले असतात.

मग आता यावर उपाय काय? सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही लोभाला बळी पडून अथवा कोणत्याही धमकीला घाबरून कोणतीही कृती करायची नाही. तर थोडे शांत राहायचे.ह मेल, मेसेज कुठून आलाय ते तपासा. संगणक असो, की मोबाईल, त्यात चांगल्या कंपनीचे अँटीव्हायरस सॉफ्टवेअर टाका. हे सॉफ्टवेअर अशा प्रकारच्या ईमेल्स अथवा मेसेज आल्यावर आपल्याला सावध करते. अशा प्रकारच्या ईमेल्स व मेसेज ब्लॉक करता येतात.

-ग्राहक पंचायत - अभय दातार

# त्यागाने योग प्राप्ती

संसारामध्ये कोणताही व्यापारी व्यापारासाठी जेवढी गुंतवणूक करतो. तेवढ्याच अधिक फायद्याचा भागीदार तो बनतो. अशाप्रकारे लक्ष, कोटी, अब्ज असा जेवढा अधिक खर्च केला जातो. तेवढाच त्याचा अधिक लाभ मिळतो. शेतकरी शेतामध्ये काही धान्य पेरतो तेव्हाच त्यापासून अधिक धान्य मिळते. यज्ञकार यज्ञामध्ये आहुती देतो, तेव्हाच त्याला लोक-परलोकामध्ये विविध ऐश्वर्य आणि सुख प्राप्त होते. अशाप्रकारे भोगत्यागनेच उत्तम भोगाची प्राप्ती होऊ शकते. मानवास वाटते की, वसन, अलंकार, उत्तम भोजन, उत्तम वनिता, पूत्र तसेच सर्वाधिक ऐश्वर्य असावे,




परंतु असे वाटण्याने हे सर्व होणे अशक्य आहे. हे सत्य आहे की, लाख प्रयत्न केल्यानंतर सुद्धा मनुष्याला शरीरात घालायला कपडे आणि पोट भरण्यास अन्न मिळत नाही. यासाठी कठोर परिश्रमाशिवाय प्रावक्त धर्माधर्मही अतिरिक्त वस्तुंच्या प्राप्तीसाठी कारण ठरतात. अन्यायानंतर प्राप्त झालेल्या धनासोबतही त्याला वैर वाटते.किंवा त्याचा विनाश होऊन जातो. किंवा योग करणाऱ्याची भोगशक्ती खत्म होऊन जाते. शेवटी त्याग आणि ग्रहण दोन्हीही शास्त्रानुसार अनुकूल वैराग्य आणि त्याग असल्याने सवर्गलोक, इंद्रलोक, वृहलोक प्राप्त होते. येथील भोगाप्रमाणे इतरत्र योग प्राप्त होने असंभव आहे. जो रस, जो शब्द, जो सुगंध तेथे आहे जी उर्वशी, राची, रंभा आदी लोकांमध्ये प्राप्त होते, ते येथे कोठे. श्वान, शकर, शृंगाल आदी योग विषयांत स्पृहाचाही काय अर्थ असू शकतो? बुद्धीमान लोक तर त्या सुखामध्ये अनित्यता आणि विनश्वरताचा अनुभव घेऊन वेगळे होतात.

# उपदेशकथा

दिवस होते पावसाळ्याचे. महात्मा गांधींजीचा आगगाडीनं प्रवास चालू होता. अचानक धो धो पाऊस कोसळू लागला अन् थोड्याच वेळात तर गांधीजींच्या डब्यात वरून पाणी ठिबकू लागलं. गार्डला हे कळलं. तो लगेच गांधीजींच्या डब्यापाशी आला. त्यानं पाहिलं तर ठिकठिकाणी बरेच पाणी ठिबकत होतं म्हणून तो जवळ आला नि गांधीजींना नम्रपणे म्हणाला, 'असं करा, तुम्ही दुसऱ्या डब्यात चला.'

गांधीजी - 'पण मग या डब्याचं तुम्ही काय कराल?'

गार्ड - तुमच्यासाठी पलीकडचा



एक डबा रिकामा करवलाय मी; त्यातले लोक येऊन यात बसतील.'

गांधीजी : 'छे, छे असं करणं योग्य नाही. इथे त्यांच्या डोक्यावर नाही का वरून अभिषेक होणार? मग मला काय हरकत इथेच बसायला? मी मात्र सुख भोगायचं नि त्या बिचाऱ्या दुसऱ्यांनी माझ्यासाठी दु:ख सहन करायचं हे कसं चालेल ! इथेच बसतो मी.' गार्ड सूज्ञ होता. त्याने विचारलं, 'बापू, माझ्यालायक काही सेवा?'

गांधीजी : 'उगीच कोणाला त्रास देऊ नको, अन् लाचबीच घेत जाऊ नका, हीच सेवा !'

कथा उपदेश : जो दुसऱ्याचे दु:ख जाणतो व दुसऱ्यासाठी स्वत: त्रास सहन करतो तोच खरा नेता होऊ शकतो.

# रोज प्या पपईच्या पानांचा रस; जाणून घ्या फायदे

पपई हे फळ एक उत्तम देखील औषध आहे. पपई असोत किंवा त्याची पाने, सर्व आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात. फायबर युक्त पपईच्या पानांचा रस केवळ तुमची रक्तातील साखर नियंत्रणात ठेवत नाही तर पचनसंस्था देखील मजबूत करते. या पानांचा रस बद्धकोष्ठतेवर रामबाण उपाय आहे, तो प्यायल्यानं आतडे पूर्णपणे स्वच्छ होतात. इतकंच नाही तर डेंग्यू तापातही हा रस खूप फायदेशीर ठरतो. टायफॉइडमध्ये अनेकदा रुग्णांच्या प्लेटलेटस कमी होतात, अशा स्थितीत या पानांचा रस प्यायल्यानं रुग्णाच्या प्लेटलेटस लवकर बऱ्या होतात.

पपईच्या पानांचा रस पिण्याचे फायदे

या रसाचं सेवन केल्यानं काही दिवसातच त्याचा परिणाम दिसून येतो.



यामध्ये जास्त प्रमाणात असलेले व्हिटॅमिन-ए, व्हिटॅमिन-बी, व्हिटॅमिन-ई आणि व्हिटॅमिन-के आपल्या शरीरासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहेत.

डेंग्यू तापावर रामबाण उपाय आणि प्लेटलेटससाठी उपयुक्त : डास चावल्यामुळे डेंग्यू ताप आल्यास, हा रस रिकाम्या पोटी प्यायल्यानं तापामुळे होणारा थकवा, डोकेदुखी, मळमळ आणि त्वचेवर पुरळ उठणारे पुरळ यापासून आराम मिळतो. अशा स्थितीत प्लेटलेटस कमी झाल्यास हा रस तात्काळ आराम देतो.

पचनक्रिया सुधारते : फायबर युक्त पपईचा रस दहा दिवस सकाळी रिकाम्या पोटी प्यायल्यानं पचनाच्या सर्व समस्यांपासून आराम मिळतो. इतकंच नाही तर आतडेही चांगल्या प्रकारे स्वच्छ होतात. त्यामुळे रुग्णाची भूक न लागण्याची समस्या संपते आणि रुग्णाला उत्साही वाटते.

केस मुळापासून मजबूत होतात : पपईच्या पानांचा अँटीऑक्सिडंट युक्त रस प्यायल्यानं केस मुळांपासून मजबूत होतात आणि त्यांची वाढही सुरू होते.

सूज कमी करण्यास उपयुक्त : पपईच्या पानांचा रस प्यायल्यानं शरीराच्या कोणत्याही भागात सूज कमी होण्यास मदत होते. स्नायू मजबूत होतात : यामध्ये असलेले पोषक घटक आपल्या शरीरातील स्नायूंना मजबूत करतात. त्यामुळे

## राशी भविष्य

१८ ऑगस्ट २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर
एखादा मोठा खर्च अनाठायी ठरणार नाही याची काळजी घ्या. कामात झालेला विलंब क्षम्य ठरणार नाही.

वृषभ : शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
विशेष आदर दाखवून केलेले हट्ट त्या त्या व्यक्तीकडून पुरविले जातील. कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न सुटेल.

मिथुन: शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
शक्यतो ज्या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार आहे असे निर्णय शक्यतो पुढे ढकला.

कर्क: शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
परगावी जाण्याचे बेत व खाण्या-पिण्याची विविधता यामुळे वेळापत्रक बिघडणे शक्य. वेळोवेळी तज्ञांचा सल्ला घ्या.

सिंह: शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण
कामाच्या ठिकाणी आपल्याला न आवडणारे काम मिळाल्यामुळे कामातील उत्साह कमी होईल.

कन्या: शुभ रंग: निळा,शुभ दिशा: दक्षिण
कोणताही खर्च करताना ङ्गअंथरूण पांघरून पाहून पाय पसरावेफ हा सल्ला दिलेला महत्त्वाचा ठरेल.

तुळ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
अनुभवी व्यक्तीबरोबर होणारी उठबस आपल्या ज्ञानात भर टाकेल. नवीन काही शिकल्याचे समाधान मिळेल.

वृश्चिक : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
भावनिक नाती व्यवहारातही उपयोगी पडतील. यशाच्या शिखराकडे होणारी वाटचाल आपापल्या क्षेत्रात प्रसिद्धी देणारी ठरेल.

धनु: शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पूर्व
कुटुंबात कलह, आजारपण, किरकोळ अपघात इ.मुळे त्रासदायक प्रसंग येणे शक्य. आरोग्य सांभाळा.

मकर: शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व
मोठेपणाच्या नावाखाली होणारा खर्च अवाक्याबाहेर जाणार नाही याची काळजी घ्या. मुलांकडे दुर्लक्ष नको.

कुंभ : शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
देवापुढे मागितलेले मागणे प्रत्यक्षात मिळण्याच्या शक्यता चांगल्याच वाढतील. मुलांच्या मागण्या पूर्ण करता येतील.

मीन : शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पूर्व
महत्त्वाचे निर्णय, बैठका शक्यतो पुढे ढकला. कुटुंबियांसमवेत सिनेमा, नाटक पहाण्याचा बेत आखाल.



१७ ऑगस्टला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सूर्य, नेपच्यून व शनीचा प्रभाव आहे. तुमची ग्रहणशक्ती उत्तम आहे. कुठल्याही समस्येच्या मुळाशी खोलवर जाऊन तुम्ही ती उलगडून पाहता. तुमची विश्लेषणशक्ती उत्तम आहे. तुमचे निर्णय तुम्ही दूरदर्शीपणाने घेता. परिणामांचा संपूर्ण विचार केल्याखेरीज तुम्ही कुठल्या कामाला हात घालत नाही. एकदा ध्येय निश्चित केल्यावर चिकाटी, सातत्य, परिश्रम यांच्या बळावर ते साध्य होईपर्यंत तुम्ही स्वस्थ बसत नाही. तुमची मनोवृत्ती गंभीर आहे. शिस्त, वक्तशीरपणाला तुम्ही महत्व देता. पैसा काटकसरीने खर्च करीत असल्याने लोक तुम्हाला कंजूष समजतात. पण वेळप्रसंगी आपल्या माणसांसाठी तुम्ही मोठा त्याग करता. लोकात मिसळण्याची सवय ठेवा. बैठे काम, व्यायमाचा अभाव यामुळे सांधेदुखी उद्भवेल. शीतपेये, थंड वातावरण, आंबट पदार्थ टाळा.

कार्यक्षेत्र : सेवावृत्ती, निष्ठा, प्रामाणिकपणा या गुणांमुळे तुम्ही लवकरच वरिष्ठांच्या कौतुकाला पात्र होता. स्वतंत्र व्यवसायापेक्षा नोकरीच जास्त अनुकूल राहील. प्रशासकीय सेवेत व व्यवस्थापकीय सेवेत लवकर उत्कर्ष होईल. पोलाद, खनिजे, तेले, चामड्याच्या वस्तू, बांधकामसाहित्य वगैरेच्या कारखान्यात वा कंपन्यात लवकर प्रवेश मिळेल. छापखाने, गुन्हेगारी, पुरातत्वसंशोधन ही क्षेत्रेही अनुकूल आहेत.

प्रणयी जीवन : तुमचा स्वभाव गंभीर असल्याने तुमच्या चित्तवृत्ती फुलून येण्यास वेळ लागतो. सहचराकडून तुम्हाला एकनिष्ठतेची अपेक्षा असते. पतिव्रता यासारख्या गुणांना तुम्ही महत्व देता. अत्याधुनिक विचाराची, फॅशनेबल, स्वैर, स्वच्छंदी माणसे तुम्हाला आवडत नाहीत. एप्रिल २१ ते मे २० मधील व्यक्ती टाळा. जून २१ ते जुलै २० मधील व्यक्ती निवडा.

वर्षफळ : दूरदर्शीपणाने नव्या धोरणांची आखणी कराल. संततीच्या शैक्षणिक प्रगतीने समाधान वाटेल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये तरूण पिढीशी संवाद साधण्याचा प्रयत्न करा. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये कार्यालयात ज्येष्ठांच्या संपर्कात रहा. जानेवारी फेब्रुवारी मध्ये परिचयाचे रूपांतर प्रेमभावनेत होईल. एप्रिल मे मध्ये तडफदार निर्णयामुळे लोकप्रियता वाढेल. जून जुलै मध्ये व्यवसायानिमित्त लांबचे प्रवास होतील.

महत्वाचे वर्ष : ८, १७, २६, ३५, ४४, ५३, ६२, ७१.

भाग्यरत्न : नीलम

याच तारेखेची व्यक्ती : सचिन, स्मिता ठाकरे

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# महाराष्ट्राची हास्यजत्रेमुळे निवेदिका अशी ओळख मिळाली



टर्निंग पॉइंट - युवराज अवसरमल

महाराष्ट्राची हास्यजत्रेमधून आपल्या सूत्रसंचालनाने प्रेक्षकांची मने जिंकणारी, अभिनेत्री म्हणजे प्राजक्ता माळी. भरतनाट्यम् नृत्यात विशारद असलेल्या प्राजक्ताचा फुलवंती' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पुण्यातील समर्थ विद्यालयामध्ये प्राजक्ताचे प्राथमिक शिक्षण झाले. पुण्यातील संत महाविद्यालयातून तिने ११ वी, १२ वी केले. पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातून भरतनाट्यम् हा नृत्याचा विषय घेऊन बी. एम. ए. केले. शाळेमध्ये, कॉलेजमध्ये प्रत्येक ठिकाणी तिने सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला होता. त्या व्यतिरिक्त एक हजार ते दोन हजार नृत्याचे कार्यक्रम तिने केले.

## आहे तर दाखवायलाच हवं

जवळपास सर्वच नृत्याच्या स्पर्धेत तिने भाग घेतला होता. आतापर्यंत तिच्याकडे नृत्यासाठी पाचशेहून जास्त ट्रॉफीज आहेत.

तिचा पहिला टर्निंग पॉइंट म्हणजे ललित कला केंद्र. जिथून तिने भरतनाट्यम् नृत्यात विशारद पूर्ण केले. तिथे तिला जाणीव झाली की, नृत्यात ती करिअर करू शकते. दुसरा टर्निंग पॉइंट म्हणजे जुळून येती रेशीमगाठी' या मालिकेमुळे तिला तिच्यातल्या अभिनेत्रीचा शोध लागला. त्यानंतरचा तिचा टर्निंग पॉइंट म्हणजे महाराष्ट्राची हास्यजत्रा.' या कार्यक्रमातून तिच्या सूत्रसंचालनाचे कौतुक होऊ लागले. आता ती निर्मिती क्षेत्रात उतरलेली आहे. फुलवंती' हा तिचा चित्रपट लवकरच येणार आहे. नृत्य, अभिनय, सूत्रसंचालन, निर्मिती असे चार ठळकपणे टर्निंग पॉइंट ती मानते.नृत्याची आवड असल्याने, नर्तिकेची मध्यवर्ती भूमिका करण्याची तिची खूप दिवसांपासून इच्छा होती. ती इच्छा फुलवंती' कादंबरीचे हक्क घेतल्याने पूर्ण झाली.

त्यावर चित्रपट निर्मिती करण्याचे तिने ठरविले आहे. जुळून येती रेशीमगाठी' मालिकेला दहा वर्षे पूर्ण झाली, प्रेक्षक अजून त्या मालिकेला व प्राजक्ताच्या अभिनयाला विसरले नाही.

महाराष्ट्राची हास्यजत्रेचा अनुभव कसा होता, असे विचारल्यावर ती म्हणाली की, मला कधीच वाटले नाही की, मी निवेदिका आहे. महाराष्ट्राच्या हास्यजत्रेमुळे मला निवेदिका ही ओळख मिळाली. लोकप्रियतेचा उच्चांक मी पाहू शकले, आर्थिक स्थैर्य दिले. पुण्य कमाईचे साधन झाले, कोरोनाच्या काळात आम्ही लोकांना हसवू शकलो. या कार्यक्रमात येणाऱ्या मान्यवरांकडून देखील आमचे कौतुक होते, असाच निखळ विनोद करत राहणे आवश्यक आहे, असे ती सांगते. परदेशात गेल्यावर तेथील प्रेक्षकांनी आम्हांला डोक्यावर घेत-ले. प्राजक्ताचे फुलवंती', भिशी' हे आगामी चित्रपट आहेत. तिला येणाऱ्या आगामी चित्रपटासाठी हार्दिक शुभेच्छा!

# कमवा व शिका यांची सांगड मोलाची

असंघटित क्षेत्र, लघू आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि अप्रेंटिसशिप योजना यामुळे देशातील रोजगार लक्षणीय प्रमाणात वाढू शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. भारतातील उत्पादनक्षेत्राचा अपेक्षित विस्तार झालेला नाही. त्यातही वाहन, वस्त्रोद्योग यांसारख्या रोजगारप्रधान क्षेत्रांमध्ये जास्त प्रणामात कामाच्या संधी निर्माण होण्याची गरज आहे. तसेच अजूनही शिक्षण आणि रोजगाराची अपेक्षित सांगड घालण्यात आपण यशस्वी झालेलो नाही. याखेरीज, निर्यातप्रधान उद्योगधंद्यांना चालना मिळाल्यास असंख्य तरुण-तरुणींना नोकऱ्या मिळू शकतील. मुद्रा योजनेंतर्गत कर्जवाटपात लक्षणीय वाढ झाली असली, तरी थकबाकीचे प्रमाण प्रचंड आहे. त्यामुळे केवळ लक्ष्यपूर्ती साधण्यासाठी दिखाऊ पद्धतीने योजना राबवणे चुकीचे आहे.

परामर्ष - हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार

महाराष्ट्र शासनाने नुकतीच शिकाऊ उमेदवारांसाठी स्टायपेंड देण्याची योजना मांडल्याने अनेकांना नोकरीची संधी मिळू शकेल. देशातील उत्पादन-क्षेत्राचा अपेक्षित विस्तार झालेला नाही. त्यातही वाहन, वस्त्रोद्योग यासारख्या रोजगारप्रधान क्षेत्रांमध्ये कामाच्या अधिक संधी निर्माण झाल्यास, शिक्षण आणि रोजगाराची अपेक्षित सांगड घातल्यास निर्यातप्रधान उद्योगधंद्यांना चालना मिळून असंख्य तरुण-तरुणींना नोकऱ्या मिळू शकतील.

मालक आणि नोकरांचे संबंध औपचारिक असतात आणि किमान दहाजण कामाला असतात, अशा संघटनेला किंवा कंपनीला औपचारिक क्षेत्र मानले जाते; परंतु भारतात दहापेक्षा कमी कामगार कामाला असलेले अनौपचारिक क्षेत्र सगळ्यात मोठे आहे. भारतातील ८० टक्के मजूर हे अनौपचारिक क्षेत्रात काम करतात आणि २० टक्के औपचारिक क्षेत्रात. यापैकी निम्मे मजूर शेतीमध्ये काम करतात आणि बाकीचे बिगर शेतीक्षेत्रात. असंघटित क्षेत्रात महिन्याच्या वेतनाऐवजी दिवसाची रोजंदारी दिली जाते. कामाचे सातत्य नसते. त्यामुळे ज्या दिवशी काम असते त्या दिवशी संध्याकाळी मजुरी घेणे असेच चालते. भारताची अर्थव्यवस्था ही मोठमोठ्या सरकारी, खासगी कंपन्या आणि त्यांची उलाढाल त्यामार्फत चालत नसून छोट्या-छोट्या व्यवहारांमधून चालते. फेरीवाले, टपरीवाले, हातगाडीवाले हे असंघटित क्षेत्रात येतात. ते स्वयंरोजगार प्राप्त करतात. पण या क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात बिगरपावतीचा आणि रोखीतला व्यवहार चालतो. अर्थात आजकाल फेरीवाले, रस्त्यावरील स्टॉलवालेदेखील ऑनलाइन पेमेंट स्वीकारतात, हा भाग वेगळा. जास्तीत जास्त व्यवसाय-उद्योग हे डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये आल्यास रोखीचे अथवा काळे व्यवहार कमी होतील, हे सरकारचे धोरण आहे. त्या दिशेने पावले पडत आहेत, हे वास्तव आहे.नुकताच केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी विभागाने २०२२-२३ चा एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्राचा अनौपचारिक उद्योग-धंद्यांमध्ये सिंहाचा वाटा असल्याचे दिसून आले. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही क्षेत्रांमधील असंघटित उद्योगामध्ये ही राज्ये पुढे आहेत. कोरोना संपल्यानंतरच्या २०२२-२३ या वर्षात गुजरात, हरियाणा, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, तामिळनाडू यांसारख्या राज्यांमधील असंघटित उद्योगांचा वाटा कमी झाला. विशेष म्हणजे बीमारू म्हणून हिणवल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशमध्ये गेल्या पाच-सात वर्षांमध्ये उत्तम प्रगती झाली आहे.

कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती तर सुध-ारली आहेच. परंतु रस्ते, उड्डाणपूल, विमानतळ, शिक्षणसंस्था या सर्व आघाड्यांवर या राज्याने प्रगती केली आहे. परंतु उत्तर प्रदेशमध्ये असंघटित उद्योगांच्या संख्येमध्ये १३ टक्के, पश्चिम बंगालमध्ये १२ टक्के तर महाराष्ट्रात नऊ टक्के इतकी भर पडली आहे. २०१५-१६ मध्ये या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येतील वाढीचा वेग कमी झाला होता. उलट, राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालान-ुसार २०२२-२३ या काळात आंध्र, आसाम, उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये असंघटित क्षेत्रातील उद्योगधंद्यांमधील कामगारांच्या संख्येत वाढ झाली, ही नक्कीच दिलासादायक आकडेवारी आहे.महाराष्ट्रात या क्षेत्रात २०१५-१६ मध्ये ९१ लाख कामगार काम करत होते, ते प्रमाण २०२१-२२ मध्ये ९८ लाख आणि २०२२-२३ मध्ये एक कोटी १५ लाखांवर जाऊन पोहोचले. मात्र उत्तराखंड, आसाम, छत्तीसगड, दिल्ली आणि जम्मू-काश्मीर या राज्यांमध्ये असंघटित क्षेत्राची वाढ अत्यंत कमी प्रमाणात झाली. देशातील अर्थव्यवस्थेत अनौपचारिक क्षेत्र हे रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे ही आकडेवारी पाहणे गरजेचे असते. २०२२-२३च्या आकडेवारीनुसार, या क्षेत्रात जवळपास ११ कोटी कामगार काम करत आहेत. यापैकी पाच कोटी ७२ लाख कामगार हे शहरा-तले तर पाच कोटी २४ लाख कामगार हे ग्रामीण भागातले आहेत. असंघटित क्षेत्रातील ही वाढ २०२१-२२ च्या तुलनेत एक कोटींपेक्षा जास्त आहे. भारतातील एकूण बेरोजगारांमध्ये तरुणांचे प्रमाण ८३ टक्के आहे. बड्या कंपन्यांची कामगिरी चांगली आहे पण उच्चशिक्षितांकडे उच्च दर्जाची कौशल्ये आहेत, त्यांनाही चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळत आहेत. परंतु अतिशय छोटे छोटे उद्योग आणि असंघटित क्षेत्रातील युनिट्स अस्तित्वासाठी झगडत आहेत.त्यांच्या क्षमतांचा अपेक्षेइतका विस्तार होत नाही.

त्यामुळे या क्षेत्राच्या गरजांकडे लक्ष पुरवण्याचे आवाहन नुकतेच नीती आयोगाचे माजी उपाध्यक्ष राजीव कुमार यांनी पंतप्रधानांना उद्देशून केले. लघू आणि मध्यम उद्योगांवर भर द्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे. या क्षेत्रासाठीचे नियम शिथिल करण्याची त्यांची सूचना आहे.असंघटित क्षेत्रातील कामगार धोकादायक परिस्थितीत काम करतात. त्यांना आरोग्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

कमी मोबदला मिळत असल्याने ते कुपोषणाने ग्रस्त आहेत, आपला वैद्यकीय खर्च करण्यास असमर्थ आहेत. फटाक्यांच्या किंवा तंबाखूच्या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना श्वस-नाचा त्रास आणि आजार होतात. कीटकनाशके आणि खतांच्या अतिवापरामुळे कृषी क्षेत्रात गुंतलेले कामगार प्रभावित होतात. त्यामुळे त्यांचे आरोग्य बिघडते. असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार अस्वच्छ परिस्थितीत, झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. तिथे पिण्याचे शुद्ध पाणी, धुण्याची जागा, शौचालय सुविधा इत्यादी मूलभूत सुविधांचा अभाव आहे. पुरुष कामगारांना समान तासांच्या कामासाठी महिला आणि बाल कामगारांच्या तु-लनेत जास्त वेतन मिळते. लहान मुलांना ढाबे, चहाची दुकाने, घरोघरी अशा क्षुल्लक नोकऱ्यांमध्ये दीर्घ तास काम करण्यास भाग पाडले जात आहे. त्यामुळे त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होतो.

दुसरीकडे, महिला कर्मचारीदेखील कामाचे दीर्घ तास आणि धोकादायक परिस्थितीपासून मुक्त नाहीत. असंघटित क्षेत्रातील कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ आणि हल्ल्यांना बळी पडतात. त्याचा त्यांच्यावर केवळ शारीरिक आणि मानसिक नव्हे, तर भावनिक प्रभावही पडतो; शिवाय महिला आणि मुलांना त्यांच्या हक्कांची जाणीव नाही.

भारतीय राज्यघटना कामगार वर्गाच्या संरक्षण आणि कल्याणासाठी एक चौकट प्रदान करते. हे संघटित आणि असंघटित कामगार शक्तीमध्ये फरक करत नाही. कलम २३ सक्तीच्या मजुरीवर बंदी घालते आणि कलम २४ मध्ये १४ वर्षापर्यंतच्या धोकादायक व्यवसायात बालमजुरीवर बंदी घालण्याची तरतूद आहे. अनुच्छेद ३९(अ) मधील तरतुदीनुसार राज्य आपल्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दिशेने धोरण निश्चितपणे निर्देशित करेल. पुरुष असो वा महिला; दोघांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान हक्क आहे. असंघटित कामगारांची दुर्दशा दुःखद आणि भीषण आहे. ते शोषण, गरिबी आणि भेदभावाच्या जाळ्यात अडकले आहेत.

प्रत्येक नागरिकाचा मूलभूत मानवी हक्क असलेल्या सामाजिक सुरक्षिततेला सरकारच्या दयेवर ठेवता कामा नये, तर त्याकडे कायदेशीर हक्कांच्या नज-रेतून पाहिले पाहिजे. असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा चांगला आहे; परंतु तरीही त्यात खूप सुधारणा करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने नुकतीच शिकाऊ उमेदवारांसाठी स्टायपेंड देण्याची योजना अर्थसंकल्पात मांडली आहे. त्यामुळे अनेकांना कामाचे शिक्षण आणि पाठ्यवेतन घेतल्यानंतर नोकरीची संधीही मिळू शकेल.

# या प्रकरणात राजकुमार रावने श्रद्धा कपूरला टाकले मागे



मुंबई-श्रध्दा कपूर, राजकुमार राव, पंकज त्रिपाठी, अपारशक्ती खुराना आणि अभिषेक बॅनर्जी स्टारर 'स्त्री २' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची चाहत्यांना बऱ्याच दिवसांपासून प्रतीक्षा होती. पण सर्वांची प्रती-क्षा संपणार आहे, 'स्त्री २' आज रात्री प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर प्रदर्शित करण्याचा निर्णय निर्मात्यांनी घेतला आहे. मात्र, निर्माते आणि स्टार्ससाठी हे युद्धापेक्षा कमी नसेल. कारण श्रद्धा कपूरचा 'स्त्री २' थेट अक्षय कुमारच्या 'खेल खेल में' आणि जॉन अब्राहमच्या 'वेदा'शी टक्कर देणार आहे.मात्र बॉक्स ऑफिसच्या या संघर्षात श्रद्धा कपूर आणि राजकुमार राव यांच्या 'स्त्री २'ला आगाऊ बुकिंगच्या बाबतीत चांगला प्रतिसाद मिळत आहे. मंगळवारी दुपारी ३ वाजेपर्यंत या चित्रपटाची २ लाख ५७ हजार ९८१ तिकिटे आगाऊ बुक झाली होती. म्हणजेच रिलीजपूर्वीच या चित्रपटाने कोटींचा व्यवसाय केला आहे. पहिल्या दिवशी हा चित्रपट चांगली कमाई करेल अशी अपेक्षा आहे. पण तुम्हाला माहिती आहे का, 'स्त्री २'साठी निर्मात्यांनी श्रद्धा कपूर आणि राजकुमार राव यांना किती पैसे दिले आहेत.

जेव्हा जेव्हा चित्रपट प्रदर्शित होतात, तेव्हा प्रेक्षकांना त्यांचे बजेट, स्टार्सची फी आणि कमाई याबद्दल जाणून घेणे आवडते. 'स्त्री' चित्रपटाचा पहिला भाग ६ वर्षांपूर्वी प्रदर्शित झाला होता. पण या ६ वर्षात स्टार्सच्या फीमध्ये फारशी वाढ झालेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, या चित्रपटासाठी निर्मात्यांनी श्रद्धा कपूरला जवळपास ५ कोटी रुपये फी दिली आहे. या चित्रपटातील अभिनेत्रीचे पात्र डायन आहे. मात्र, फीच्या बाबतीत राजकुमार राव थोडा पुढे गेला आहे. एका रिपोर्टनुसार, निर्मात्यांनी 'स्त्री २' साठी अभिनेत्याला ६ कोटी रुपये फी दिली आहे.श्रद्धा आणि राजकुमार यांच्या फीमध्ये एक कोटी रुपयांचा फरक आहे. चित्रपटाच्या पहिल्या भागाबद्दल सांगायचे तर, स्त्रीने ३० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवला होता. तथापि, स्त्री २ चे बजेट पहिल्या भागापेक्षा दुप्पट आहे. दुसरा भाग बनवण्यासाठी निर्मात्यांनी सुमारे ६० कोटी रुपये खर्च केले आहेत. 'स्त्री' ब्लॉकबस्टर ठरला. या चित्रपटाने जगभरात बॉक्स ऑफिसवर १८२ कोटी रुपयांचा चांगला व्यवसाय केला होता. या चित्रपटाने भारतात जवळपास १६७ कोटींची कमाई केली होती. कॉमेडी हॉरर 'स्त्री २' चा पहिला शो १४ ऑगस्ट रोजी रात्री ९.३० वाजता सुरू होईल.


# हाय कोलेस्ट्रॉलने त्रस्त असाल तर लसूणचा करा असा वापर

मुंबई: हल्लीच्या काळात खराब लाईफस्टाईल आणि खाण्यापिण्याच्या सवयीमुळे कोलेस्ट्रॉल वाढण्याची समस्या सातत्याने लोकांमध्ये वाढत आहे. कारण त्यानंतर हॉर्ट अ‍ॅटॅकचाही धोका वाढतो.

हाय कोलेस्ट्रॉलमुळे हॉर्ट अ‍ॅटॅक आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. दरम्यान, खाण्या-पण्याच्या माध्यमातून कोलेस्ट्रॉल बऱ्याच प्रमाणात नियंत्रित ठेवता येतो. लसूण खाल्लयाने खराब कोलेस्ट्रॉल दूर करण्यास मदत मिळते. जेव्हा शरीरात खराब कोलेस्ट्रॉल वाढते तेव्हा हॉर्ट अ‍ॅटॅक आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. शरीरात कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यासाठी सगळ्यात आधी खाण्यापिण्याच्या सवयीत बदल करा. यासाठी काही भाज्या आणि आयुर्वेदिक उपायांना आपल्या दिनचर्येत सामील करा. यामुळे शरीराला रोगमुक्त बनवण्यासाठी तसेच खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत मिळेल. आपल्या दिनचर्येत अशा गोष्टी सामील करा जे तुम्ही या जीवनशैलीचा भाग बनवू शकता. यामध्ये लसूण अतिशय फायदेशीर ठरते. तुमच्या खाण्यात कच्च्या लसणीचा समावेश करा. यामुळे खराब कोलेस्ट्रॉल आणि वाढलेले ट्रायग्लिसराईड अगदी सहज कमी केले जाऊ शकते. लसूण हाय ब्लड प्रेशर नियंत्रित करण्यास मदत करते. तुम्ही खाण्यामध्ये लसूणचे प्रमाण वाढवू शकता अथवा लसूणची चटणी, लोणचे यांचा समावेश करू शकता.

सकाळी रिकाम्या पोटी लसूण हाय कोलेस्ट्रॉलच्या रुग्णांसाठी अतिशय फायदेशीर आहे. लसूण अगदी सहज चावून खाता येते. थोडे कडवट लागल्यास त्यावर पाणी पिऊ शकता. या पद्धतीने लसूण खाऊन खराब कोलेस्ट्रॉल कमी केले जाऊ शकते.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात ध्वजारोहण संपन्न



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत शासन निर्णयानुसार दि १३, १४ व १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण होणार असून दि.१३ ऑगस्टला स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले तर आज दि १४ ऑगस्ट ला स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते सादर केली.पर्यवेक्षक किरण नेमट यांनी तिरंगा प्रतिज्ञा तर श्रीपाद सन्मुखे यांनी तंबाखूमुक्त शाळा अशी प्रतिज्ञा घेतली. जान्हवी देशपांडे यांनी एकात्मता स्तोत्र घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती म्हणून स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे मुख्याध्यापक अनंतराम कोपले उपमुख्याध्यापक अरुण पत्की पर्यवेक्षक कृष्णा मारावार पर्यवेक्षक किरण नेमट ,माधव मठवाले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभ्यास पूरक मंडळ प्रमुख आशा गौतम यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मातृभूमी महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न




**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर येथील मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित मातृभूमी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्तदान शिबिर संपन्न झाले विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्यवीराबद्दल कृतज्ञता व अभिवादन म्हणून मागील पंधरा वर्षापासून रक्तदान १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी रक्तदान शिबिर घेतले जाते यावेळी या शिबिराचे उद्घाटन मातृभूमी महाविद्यालयाच्या प्राचार्य उषा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले यावेळी सुधीर पाटील संजय राठोड राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा बिभीषण मद्देवाड, प्रा रण-जीत मोरे प्रा. उस्ताद शेख , संतोष जोशी ,रेखा रणक्षेत्रे, जगदिशा ओंकारे आदीची उपस्थिती होती या रक्तदान शिबिरात ४२ बेचाळीस रक्तदात्यांनी रक्तदान केले मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित कस्तुराबाई नरसिंग स्कूल मातृभूमी नर्सिंग स्कूल , मातृभूमी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रक्तदान शिबीरात सहभाग घेत शिबीर यशस्वी केले.

---

*तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीरयांचे कार्यालय*
(दंडणीय विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१६/०८/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार पठाण गफ्फारखान जब्बार खान रा.उदगीर ता. उदगीर यांचा मुलगा नामे पठाण गौसखान गफ्फार खान याचा जन्म दिनांक ०८/१०/१९७७ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म/मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार पठाण गफ्फारखान जब्बार खान रा.उदगीर यांनी त्यांचा मुलगा याचा जन्म दिनांक ०८/१०/१९७७ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०२/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा याचा जन्म दिनांक ०८/१०/१९७७ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार पठाण गफ्फारखान जब्बार खान रा.उदगीर यांचा मुलगा नामे पठाण गौसखान गफ्फार खान याचा जन्म दिनांक ०८/१०/१९७७ रोजीची नोंद मुख्याधिकारी नगर परिषद उदगीर ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल. आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी दिले.

पुढे नेमलेली तारीख १७/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार उदगीर

---

*तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीरयांचे कार्यालय*
(दंडणीय विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१६/०८/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार सय्यद निसार बशीर रा.उदगीर ता. उदगीर यांची मुलगी नामे सय्यदा सबीहा बेगम सय्यद निसार हिचा जन्म दिनांक ०५/०६/९९८५ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म/मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार सय्यद निसार बशीर रा.उदगीर यांनी त्यांची मुलगी हिचा जन्म दिनांक ०५/०६/१९८५ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०२/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांची मुलगी हिचा जन्म दिनांक ०५/०६/१९८५ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार सय्यद निसार बशीर रा.उदगीर यांची मुलगी नामे सय्यदा सबीहा बेगम सय्यद निसार हिचा जन्म दिनांक ०५/०६/१९८५ रोजीची नोंद मुख्याधिकारी नगर परिषद उदगीर ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी दिले.

पुढे नेमलेली तारीख १७/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार उदगीर

---

*तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीरयांचे कार्यालय*
(दंडणीय विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१६/०८/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार पठाण गफ्फार खान जब्बारखान रा.उदगीर ता. उदगीर यांची मुलगी नामे खान यासमीन गफ्फार खान हिचा जन्म दिनांक ०४/०२/१९७६ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म/मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार गफ्फार खान जब्बारखान खान रा.उदगीर यांनी त्यांची मुलगी याचा जन्म दिनांक ०४/०२/१९७६ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०२/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांची मुलगी हिचा जन्म दिनांक ०४/०२/१९७६ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार पठाण गफ्फारखान जब्बार खान रा.उदगीर यांची मुलगी नामे खान यासमीन गफ्फार खान हिचा जन्म दिनांक ०४/०२/१९७६ रोजीची नोंद मुख्याधिकारी नगर परिषद उदगीर ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी दिले.

पुढे नेमलेली तारीख १७/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार उदगीर

---

**जाहिरनामा**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र. ११०/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार जगदेवी भ्र. भरत म्हेत्रे रा. देवणी खु., ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराचे पती नामे भरत बाबुराव म्हेत्रे हे दिनांक ०६/०७/२०२४ रोजी मौजे देवणी खु. ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले असुन ते मौजे देवणी खु., ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते. त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | जगदेवी भ्र. भरत म्हेत्रे | ३१ | पत्नी |
| २) | सार्थक भरत म्हेत्रे | ११ | मुलगा |
| ३) | पायल भरत म्हेत्रे | ९ | मुलगी |
| ४) | जयश्री भ्र. बाबुराव म्हेत्रे | ६५ | आई |

अर्जदार जगदेवी भ्र. भरत म्हेत्रे रा. देवणी खु., ता.देवणी जि.लातूर यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०७/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २३/०९/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (आर.एस.वाघमारे) (सहा.अधिक्षक)

---

**जाहिरनामा**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र. ८२/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार विठ्ठल पिता तुकाराम गरड व इतर ज्यापेक्षा पिता नामे तुकाराम विठ्ठल गरड हे दिनांक ३०/०४/२०२१ रोजी मौजे देवणी खु. ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | विठ्ठल तुकाराम गरड | | मुलगा |
| २) | ज्योतिबा तुकाराम गरड | | मुलगा |
| ३) | सुमनबाई भ्र. तुकाराम गरड | | पत्नी |
| ४) | महानंदा भ्र. बालाजी बिरादार | | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १३/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : १३/०९/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

---

*तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय*
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.०२/०८/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार तोगरे भिवा लालु वय ३९ वर्ष रा. धामणगाव ता. जळकोट जि. लातुर यांचा मुलगा नामे तोगरे विक्रांत भिवा यांचा जन्म मौजे धामणगाव ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक. १८/०१/२००६ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील तोगरे विक्रांत भिवा यांची जन्म दिनांक १८/०१/२००६ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तोगरे विक्रांत भिवा यांचा जन्म दिनांक १८/०१/२००६ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु तोगरे विक्रांत भिवा जन्म दिनांक-१८/०१/२००६ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय धामणगाव ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ०२/०८/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख ०३/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

---

**वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**
**मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २३९/२०२४ नि.क्र. ०७

ज्यापेक्षा नामे Pralhad S/o Maroti Survase हे दिनांक ०२.१०.२०१८ रोजी At. Shend (South) Tq.Shirur anathpal Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Vachachhalabai @ Vatsalabai W/p Pralhad Survase Age 80 years, Occu. H.H. Shend (South) Tq.Shirur anathpal Dist.Latur
2) Satyabhama W/o Sagharam Somwanshi Age 65 years, Occu. H.H. R/o Tujpur Tq.Nilanga Dist.Latur
3) Nirmala W/o. Pralhad Shinde Age 62 years, Occu. Agri. R/o. Talegaon Tq.Shirur anathpal, Dist.Latur
यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Vachachhalabai @ Vatsalabai W/p Pralhad Survase | 80 | Wife |
| 2) | Satyabhama W/o Sagharam Somwanshi | 65 | Daughter |
| 3) | Nirmala W/o. Pralhad Shinde | 62 | Daughter |

अर्जदार यांना Pralhad S/o Maroti Survase या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Pralhad S/o Maroti Survase याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २३/०९/२०२४

डी.ए.कांबळे, कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

---

**वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**
**मा.जे.सी. गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६३३/२०२४ नि.क्र. ०६

ज्याअर्थी अर्जदाराचे वडील नामे Gangaram S/o Honappa Mehtre, R/o Yenki Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक ०८.०४.२०२० रोजी व तसेच अर्जदाराचा भाउ Tukaram S/o Gangaram Mehtre हे दिनांक ०४.११.१९९९ रोजी व तसेच अर्जदाराचा भाउ Mashnaji S/o Gangaram Mehtre हे दिनांक २८.०८.२०२१ तिघेही Yenki Tq.Udgir Dist.Latur मयत झाले आहेत व अर्जदार
Ashok S/o. Gangaram Mehtre,
Age 38 yrs, Occu. Labour,
R/o. Yenki Tq.Udgir Dist.Latur
यांनी खालील नमुद ९ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1 | Rajabai W/o Gangaram Mehtre | 70 | Wife |
| 2 | Ajay S/o Gangaram Mehtre | 49 | Son |
| 3 | Ashok S/o Gangaram Mehtre | 38 | Son |
| 4 | Chamkulabai W/o Gunwant Honale | 50 | Daughter |
| 5 | Kavita W/o Tukaram Mehtre | 45 | Daughter in law |
| 6 | Pratiksha W/o Dnyaneshwar Rajure | 25 | Grand Daughter |
| 7 | Lobhita W/o Mashnaji Mehtre | 45 | Daughter in law |
| 8 | Birbal S/o Mashnaji Mehtre | 24 | Grandson |
| 9 | Nagesh S/o Mashnaji Mehtre | 22 | Grandson |

अर्जदार याने Gangaram S/o Honappa Mehtre या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Gangaram S/o Honappa Mehtre याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २१/०९/२०२४

संतोष डी. शिंदे, कनिष्ठ लिपीक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

---

**उदगीरमनोरंजन**

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो










**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया, अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे, सचिव

# सोयाबीनवरील विषाणूजन्य हिरवा आणि पिवळा मोझॅक रोगाचे व्यवस्थापन

लातूर, / प्रतिनिधी- सद्यास्थितीत मराठवाड्यातील बऱ्याच भागात सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक तसेच काही ठिकाणी हिरवा मोझॅक म्हणजेच केवडा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. पिवळा मोझॅक हा रोग मुंगबीन यलो मोझॅक वायरस या विषाणूंमुळे होतो. तर हिरवा मोझॅक हा सोयाबीन मोझॅक वायरस या विषाणूमुळे होतो. कडधान्य आणि तणे ही या रोगाची पर्यायी यजमान पिके आहेत. या विषाणूजन्य रोगामुळे सोयाबीनमध्ये १५ ते ७५ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते. शेतकऱ्यांनाही या रोगाची लक्षणे ओळखुन एकात्मिक व्यवस्थापन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

हिरवा मोझॅकची लक्षणे

झाडाची पाने ही जाडसर, आखूड तसेच कडक होतात व खालच्या बाजूने सुरकुतलेली किंवा मुरगळलेली असतात. पाने साधारण पानांपेक्षा जास्त गर्द हिरव्या रंगाची दिसतात. प्रादुर्भावामुळे झाडाची वाढ खुंटते. हा विषाणू बियाणे व पानातील रसामार्फत पसरतो आणि हा प्रसार मुख्यतः मावा या रसशोषक किडीद्वारे केला जातो.

पिवळा मोझॅकची लक्षणे

सोयाबीनच्या पानाच्या मुख्य शिरीपाशी विखुरलेल्या अवस्थेत पिवळ्या रंगाचे चट्टे अथवा अनियमित पट्टे दिसतात त्यानंतर पाने जसे जसे परिपक्व होत जातात, तसे तसे त्यावर गंजलेले तांबूस रंगाचे चट्टे दिसतात. काही वेळा जास्त प्रादुर्भाव असल्यास पाने अरुंद होतात व मुरगळतात. लहान अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास पूर्ण झाड पिवळे पडते. हा विषाणू पानातील रसामार्फत पसरतो आणि हा प्रसार पांढरी माशी या रसशोषक किडीद्वारे होतो.

रोगास कारणीभूत घटक

केवडा रोग उबदार तापमान, अति दाट पेरणी या रोगाच्या वाढीस कारणीभूत ठरते.आद्र हवामानात हा रोग वाढत जातो.

नुकसानीचा प्रकार

दोन्हीही प्रकारच्या मोझॅकमुळे झाडाच्या अन्न निर्मिती प्रक्रियेमध्ये बाधा होऊन, अशा प्रादुर्भावग्रस्त झाडांना कालांतराने फुले आणि शेंगा कमी लागतात. त्यातील दाण्यांचा आकार लहान राहतो किंवा संपूर्ण शेंगा दाणे विरहीत राहून पोचट होतात. पर्यायाने उत्पन्नात मोठी घट येते. तसेच दाण्यांमधील तेलाचे प्रमाण घटते तर प्रथिनांच्या प्रमाणात वाढ होते.

सोयाबीनवरील पांढरी माशी, मावा आणि मोझॅक विषाणूचे एकात्मिक व्यवस्थापन

काही सोयाबीन पिकाचे वाण या रोगास लवकर आणि जास्त प्रमाणात बळी पडतात. त्यामुळे या रोगास बळी पडणाऱ्या वाणाची लागवड न करता आपल्या भागात विद्यापीठाद्वारे शिफारस केलेल्या सोयाबीन वाणांचीच लागवड करावी. पेरणीस निरोगी बियाण्याचाच वापर करावा. लागवडीनंतर वेळोवेळी पिकाचे कीड व रोगांसाठी निरीक्षण आणि सर्वेक्षण करावे. मोझॅक (केवडा) झालेली प्रादुर्भावग्रस्त झाडे दिसून येताच, ती वेळोवेळी तात्काळ समूळ काढून बांधावर न फेकता जाळून अथवा जमिनीत पुरून नष्ट करावीत. जेणेकरून निरोगी झाडांवर होणारा किडीचा व रोगांचा प्रसार कमी करणे शक्य होईल. पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पिकामध्ये १२ इंच १० इंच आकाराचे हेक्टरी १० ते १५ पिवळे चिकट सापळे लावावेत. नत्रयुक्त खताचा संतुलित वापर करावा. मूग, उडीद यासारख्या पर्यायी खाद्य वनस्पतीवरून पिवळा मोझॅक रोगाचा प्रसार रोखण्यासाठी अशा पिकावरील पांढरी माशीचे व्यवस्थापन करावे. पीक तणमुक्त ठेवावे. ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

रोगाच्या प्रसारास कारणीभूत असलेल्या मावा व पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी पिकावर रोगाची लक्षणे दिसताच किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून असिटामिप्रीड २५ टक्के + बाइफेन्थ्रीन २५ टक्के डब्ल्यू जी १०० ग्रॅम (५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) (लेबल क्लेम कीटकनाशक) किंवा थायमिथोक्झाम १२.६ टक्के आणि लॅम्बडा सिहॅलोथ्रीन ९.६ टक्के झेडसी ५० मिली (२.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) (लेबल क्लेम नाही) यापैकी एका किटकनाशकाची फवारणी प्रति एकर या प्रमाणात करावी.

कीटकनाशकाचे प्रमाण साध्या पंपासाठी आहे पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे. मावा व पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी आवश्यकता वाटल्यास दहा दिवसानंतर परत एकदा कीटकनाशकांची फवारणी करावी. फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा सामू ५ ते ७ असावा, शेतात कीटकनाशकाचे द्रावण तयार करताना व फवारणी करताना चष्मा, हातमोजे, तोंडावर मास्क व संरक्षित कपड्याचा वापर करावा तसेच घुटका, तंबाखु खाऊ नये व बीडी पिऊ नये. बिगर हंगामी सोयाबीनची लागवड शक्यतो टाळावी जेणेकरून किडीच्या जीवनक्रमात खंड पडतो आणि पुढील हंगामात पर्यायाने किडींचा प्रादुर्भाव कमी राहतो, असे कृषि विभागाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# येरगी बालिका पंचायत ओवाळणी तून मिळालेल्या २२ हजार ४०० रुपयांचे शैक्षणिक साहित्य जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना देणार

## रक्षाबंधन निमित्त बालिका पंचायत चा आगळा वेगळा उपक्रम




देगलूर(प्रतिनीधी):- आज रक्षाबंधन निमित्त तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथे बालिका पंचायत राज समितीच्या वतीने रक्षाबंधनाचा सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून देगलूर पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक विश्र्वनाथ झुंझारे हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच संतोष पाटील यांची उपस्थिती होती.

गावातील मारोती मंदिराजवळ बालिका पंचायत द्वारा आयोजित सार्वजनिक रक्षाबंधन कार्यक्रमात गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक विश्र्वनाथ झुंजारे यांनी बालिका पंचायत राज चे कौतुक करत गावातील विकास कामांची प्रशंसा केली. बालिका पंचायत राज कडून घेतलेल्या दारू बंदी,हुंडा बंदी आदी महत्वाच्या निर्णयावर बोलताना म्हणाले की गावात या विरोधात कोणी वागत असेल ,कोणी दारू पित असेल किंवा विकत असेल तर त्याची गय न करता त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल.दारूबंदी , गुठका बंदी चा निर्णय अतिशय स्तुत्य असून यावर होणारा खर्च आपल्या परिवाराच्या प्रगती साठी वापरावा असे ते म्हणाले.

बालिका पंचायत राज समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना राख्या बांधून त्यांचे औक्षण केले. प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक विश्र्वनाथ झुंजारे,सरपंच संतोष पाटील,ग्राम विकास अधिकारी राजेश तोटावाड, ईश्र्वर वाडीकर, तंटामुक्त अध्यक्ष, सर्व शिक्षक, बालिका पंचायत राज समितीचे सरपंच अंजली वाघमारे,उपसरपंच पुनम सुर्यवंशी, ग्रामसेवक महादेव दाणेवार,ग्रामपंचायत सदस्य शिवकांता भुरळे,रोहिणी दाणेवार, सपना काळीगवार, महादेव गादगे, महादेव गोशट्टी, श्रीदेवी धाकपाडे, रूद्राणी चैडके, आश्र्विनी पांचाळ,तंटामुक्त अध्यक्ष शिवाणी मठपती, पोलिस पाटील अनिता बागेवार, आजी माजी सर्व पदाधिकारी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या प्रत्येकाने आपापल्या परीने ओवाळणी दिली. यातून तब्बल २२ हजार ४०० रुपये जमले आहेत.

बालिका पंचायत या २२ हजार ४०० रुपयांचे शैक्षणिक साहित्य घेऊन गावातील शाळेला देणार आहे. यामुळे गावातील विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होईल.

रक्षाबंधन निमित्त बालिका पंचायत राज समितीच्या वतीने आयोजित सार्वजनिक रक्षाबंधन कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

पान १ वरून

### झेलेन्स्कींचे....

झाली होती. शिखर परिषदेत अमेरिका आणि नाटो सहकाऱ्यांनी रशियाचा मुकाबला करण्यासाठी युक्रेनला समर्थन देण्याबाबत एकजूट दाखवली होती. त्यावेळेस अमेरिकेने रशियासोबतच्या भारताच्या संबंधांबाबत चिंता व्यक्त केली होती.

### तर मी...

प्रकारे जाणीवपूर्वक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न अतिशय अयोग्य आहे. मी पुन्हा एकदा सांगतो शिंदे साहेबांनी जर या ठिकाणी सांगितले की मराठा आरक्षणाकरता त्यांना निर्णय घ्यायचा आहे आणि त्या निर्णयामध्ये मी अडथळा निर्माण केलेला आहे तर मी राजीनामा देईनच, पण राजकारणातून देखील संन्यास घेईन, असा पुनरुच्चारहि फडणविसांनी केला.

### नवाब मलिकांच्या...

१३ वर्षांपासून अजित दादांसोबत नातं

आपण एक आठवड्यापूर्वी यासाठी तयारी सुरु केली होती आणि अचानक कळलं की मला आज या कार्यक्रमात भाषण करायचं आहे. १३ वर्षांपासून अजित दादा आणि माझं नातं आहे, त्यांनी माझ्या कार्यालयाचं तेंव्हा उद्घाटन केलं होतं. याच ठिकाणी आपण ५ वर्षांपूर्वी अनुशक्तीनगर निवडणुकीची सुरुवात केली होती, आणि नवाब मलिक यांना निवडून आणले. त्यानंतर आपल्याला रिटर्न गिफ्ट म्हणून मलिक साहेब यांना मंत्री केल्याची आठवण सना मलिक यांनी भाषणात सांगितली. कोरोनाचा काळ होता, तेंव्हा मोठी अडचण आमच्यासमोर आली. दीड वर्ष आमच्यासोबत कुठलाही आमदार नव्हता. मात्र, जेंव्हा गरज पडली तेंव्हा अजित दादांनी मला साथ दिली. नवाब मलिक अनुपस्थित असताना अनेकांनी कटकारस्थान केलं, काम थांबविले. पण, दादांनी संकटात आमची साथ दिल्याचंही सना मलिक यांनी म्हटलं.

लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवावी

लाडकी बहीण योजना सुरु केली तेंव्हा अनेक भ्रम पसरविण्यात आले. लोकांना वाटत नव्हतं योजनेचे पैसे येतील. पण, आम्हाला १४ ऑगस्टला कॉल यायला लागले, ३००० रुपये आले. त्यामुळे, आम्ही पूर्ण अनुशक्तीनगरच्या महिला पूर्णपणे धन्यवाद देतो, तसेच ३१ ऑगस्टची डेडलाईन तुम्ही योजनेची वाढवावी आणि रक्कम थोडी वाढवून द्यावी, असे निवेदन महिलांकडून मी करते, असेही सना यांनी भाषणात म्हटले.

२ कोटी ५० लाख महिला अर्ज करतील - अजित पवार

रक्षाबंधन राज्यभर साजरा केला जातोय, वेगवेगळ्या जिल्ह्यात आम्ही जातोय आणि राज्यभर यात्रा करतोय. संवाद आम्ही वेगवेगळ्या वर्गासोबत साधतोय.

योजनाची माहिती आम्ही लोकांपर्यत पोहचतोय. मी राखीची शपथ खातो की माझ्या बहिणीला सक्षम करण्याचा आत्मसन्मानाने त्यांना जगता यावं यासाठी पूर्णपणे प्रयत्न करेल. ३१ जुलै आधी ज्यांनी अर्ज भरले त्या महिलांना पैसे आले आहेत. अजूनही अर्ज भरले जात आहेत. राज्यातील १ कोटी १० लाख महिलांना पैसे मिळाले आहेत. ३१ ऑगस्टपर्यंत किती महिला लाडकी बहीणी अर्ज करतात हे बघू, आमचा अंदाज आहे ३१ ऑगस्ट पर्यत २ कोटी ५० लाख महिला अर्ज भरतील, असे अजित पवार यांनी म्हटलं.

३ महिन्यांचे ४५०० रुपये मिळतील

ज्यांनी अर्ज भरला नाही त्यांनी चिंता करू नका, अजून वेळ आहे. प्रत्येकाला पैसा मिळणार, ज्यांना अर्ज भरून पैसे आले नाहीत त्यांना सप्टेंबरमध्ये पैसे येतील. जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरचे मिळून एकत्र ४५०० रुपये येतील, अशी माहितीही अजित पवार यांनी दिली. ही लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, हा चुनावी जुमला नाही. ५ वेळेस उपमुख्यमंत्री म्हणून मी काम केलं आहे, ४५ हजार कोटी रुपयांची तरतूद या योजनेसाठी केलीय. तुमच्या खात्यात जो पैसा आलाय तो वापस घेण्यासाठी दिलेला नाही, तुमच्या खात्यातला पैसा आता तुमचाच आहे, असेही अजित पवार यांनी म्हटलं.

### अतिवृष्टीने...

मदत मिळवून देण्याचे आश्र्वासनही ना. बनसोडे यांनी शेतकऱ्यांना दिले. दरम्यान, बनसोडे यांच्यासह अधिकाऱ्यांच्या ताफ्यालाही वडगाव येथे पावसाने झोडपले. त्यामुळे त्यांना कांही वेळ वडगावला थांबावे लागले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मा. अध्यक्ष राहुल केंद्रे, उपनगराध्यक्ष मन्मथ आप्पा किडे, उषाताई कांबळे, कांग्रेसचे मारोती पांडे, शहराध्यक्ष महेश धुळशेट्टे, बाजार समितीचे सभापती विठ्ठल चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे मा. ता. अध्यक्ष अर्जुन आगलावे, तालुकाध्यक्ष संग्राम पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य चंदन पाटील, गजानन दळवे, मंगेश गोरे, संतोष पवार, महावितरचे दराडे, मंडळाधिकारी कमलाकर पन्हाळे, सहा. कार्यक्रमाधिकारी सुधाकर बुके, आकाश वाघमारे, बालाजी दहिफळे, बालाजी गुट्टे, भारत मरसोने, अमृत गोरे, वसंत मरसोने, राहुल केंद्रे, मुंडे, हिंदोळे, लक्ष्मण तगडमपल्ले, केरबा सावकार, पांडुरंग बळवंते, सरपंच दामोदर बोडके, उपसरपंच मल्लिकार्जुन भुरे, नामदेव बोडके, बाबूराव देवकत्ते, काशिनाथ गुड्डा, उत्तम भुरे, बालाजी नांवदे, गजानन गुंडरे, रामेश्र्वर भुरे आदी उपस्थित होते.

### युद्धाच्या...

कमांड सेंटरमधून हे ड्रोन कंट्रोल करता येते.

३० एचपी वँकेल इंजिनमुळे हे ड्रोन १०० ते १२० किलो वजन वाहून नेऊ शकते. यामध्ये ३० ते ४० किलोंची स्फोटक आहेत. एनएएल ही संस्था सीएसआयआर ची घटक आहे. १९५९ साली सीएसआयआर ची स्थापना झाली. दुस-या महायुद्धापासून कामिकाझे ड्रोनची संकल्पना अस्तित्वात आली. जपानी वैमानिक शत्रूच्या टार्गेटवर थेट आपलं विमान धडकवायचे. यात मानवी जीवाचे सुद्धा नुकसान व्हायचे.

आता कामिकाजे ड्रोनमुळे शत्रुची वित्तहानी, जिवीतहानी होईल पण आपले मानवी नुकसान होणार नाही. कारण हे मानवरहीत ड्रोन्स आहेत. कामिकाजे ड्रोनचे वैशिष्टय म्हणजे जीपीएस चालत नाहीत, अशा ठिकाणी सुद्धा ही ड्रोन्स काम करतात. इस्रोने विकसित केलेली एनएव्हीआयसी सिस्टिम या ड्रोन्समध्ये आहे. त्यामुळे जीपीएस सिग्नल जॅम असलेल्या भागात सुद्धा हे ड्रोन्स आपले काम अचूकतेने करतात.

### देशातील...

आल्याचे गाइड सांगतात.

पर्यटकांमध्ये उत्सुकता

किल्लयावर एकूण २६९ तोफा आहेत. या तोफांविषयी पर्यटकांमध्ये उत्सुकता पाहायला मिळते. तोफ कशी बनविली, किल्लयावर कशी आणली, किती वजन आहे, असे अनेक प्रश्र्न पर्यटक विचारतात देवगिरी किल्लयावरील सिराज शेख यांनी सांगितले.

### रोटरी क्लब...

मुबलक पाण्याच्या रूपाने आपण सर्वजण घेत हे सांगतानाच खा. डॉ. काळगे यांनी लातूरच्या महाप्रलयंकारी भूकंपाच्या वेळी रोटरी परिवाराने केलेल्या मदत कार्याची आवर्जून आठवण काढली. यावेळी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने खा. डॉ. काळगे याना लातुरात एफएम रेडिओ केंद्र सुरु करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. या निवेदनावर लवकरात लवकर कारवाई करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू,असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदयसिंह मोहिते पाटील यांनी रोटरी परिवाराच्या कामाचे कौतुक करून सर्वच क्षेत्रात रोटरी परिवार झोकून देऊन कार्यरत असल्याचे नमूद केले. इंजि. सुधीर लातूरे यांनी रोटरीच्या कार्याची खोली समुद्रापार असल्याचे बोलून दाखवले. रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे मावळते अध्यक्ष पुरुषोत्तम नोगजा यांनी आपल्या कार्याचा अहवाल सादर केला. नूतन अध्यक्ष डॉ. संजय वारद यांनी यांनी आपले मनोगत व्यक्त करतानाआपणा मागच्या १४ वर्षांपासून रोटरी परिवारात सक्रिय असल्याचे सांगितले. भारताच्या पोलिओ निर्मूलनात रोटरीचा सिंहाचा वाटा आहे. रोटरीकडे येणारी मदत नेहमीच चांगल्या कामासाठी वापरली जात असल्याचे सांगून आपल्याला रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या अध्यक्षपदी काम करण्याच्या मिळालेल्या संधीचे आपण नक्कीच सोने करू असे त्यांनी सांगितले.

यावेळी रोटरी परिवाराच्या वतीने उत्कृष्ट रोटरी सेवा पुरस्काराने वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचारी सतीश लोंढे व शासकीय रुग्णालयातील नर्स अरुणा सोनार यांचा सन्मान करण्यात आला. निशांत ओमप्रकाश मोतीपवळे याचाही यावेळी खा. डॉ. काळगे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हेमंत रामढवे व सौ. प्रणिता हेमंत रामढवे यांनी तर आभार प्रदर्शन विनोद पंडगे यांनी केले. याप्रसंगी रोटरीचे माजी प्रांतपाल विजयभाऊ राठी, डॉ. हरीप्रसाद सोमाणी, लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे , डॉ. सतीश बिराजदार, डॉ. जगताप, बसवराजप्पा उटगे, रामदास भोसले, गिरीश ब्याळे , गिरीश गारटे, उमाकांत मद्रेवार , सौ. सविता मोतीपवळे , सौ. वारद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# चित्ररथाद्वारे महाज्योती च्या योजनांची होणार जनजागृती

लातूर, / प्रतिनिधी- राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) मार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. याबाबत जिल्ह्यात चित्ररथाद्वारे जनजागृती केली जाणार असून प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले यांनी आज या चित्ररथाला हिरवी झेंडी दाखविली.

उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक शिवकांत चिकुर्ते यावेळी उपस्थित होते.

राज्यातील इतर मगासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी, युवकांसाठी महाज्योती मार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत. या योजनांची जनजागृती करण्यासाठी महाज्योती मार्फत चित्ररथ तयार करण्यात आला आहे. हा चित्ररथ जिल्ह्यातील ग्रामीण भागात जावून योजनांची माहिती देणार आहे.

# वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात हर घर तिरंगा अभियान व स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

देगलूर (प्रतिनिधी) : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशात सुरू करण्यात आलेली हर घर तिरंगा मोहीम वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात उत्साहाने साजरी करण्यात आली. दिनांक १३, १४ व १५ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयात प्रतिदिन सकाळी ठीक ०७.३५ वा. सचिव राजेश महाराज देगलूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

हर घर तिरंगा मोहिमेचा एक भाग म्हणून शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या घरावरही तिरंगा ध्वज फडकावून ध्वजाला सलामी दिली. क्रीडा संचालक व उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके, उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने, उपप्राचार्य डॉ. प्रकाश कुकाले, यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी परिसरातील स्मारक स्वच्छतेचा कार्यक्रम यशस्वीपणे राबवला. तसेच या मोहिमेची जनजागृती करण्यासाठी भव्य तिरंगा रॅलीचेही महाविद्यालयातर्फे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण समारंभानंतर स्पंदना माडपले, प्रतीक्षा वाघमारे, मेनके अनुजा या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीते गायली. सामाजिक समस्यांचे निर्मूलन व राष्ट्रीय विकासास पुरक अशा प्रकारचे विविध संशोधन प्रकल्प प्राध्यापक वृंदांनी हाती घेऊन ते पूर्णत्वाला न्यावेत असे आवाहन याप्रसंगी सचिव राजेश महाराज देगलूरकर यांनी केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला अनुसरून विद्यार्थ्यातील कौशल्य विकास वृद्धिंगत करणे, विद्यार्थ्याना स्वावलंबी व एक आदर्श नागरिक बनवण्यासाठी कार्यरत राहणे ही सुद्धा एका अर्थाने राष्ट्रभक्तीच आहे, असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. हर घर तिरंगा मोहिमेच्या विविध उपक्रमांची सांगता राष्ट्रगीताने संपन्न झाली.


**CHANGE OF NAME**

Old name: Pathan Irfan Bashirkha

My New name: Pathan Irfan Bashirkhan

**ADDRESS**

Pathan Manzil,
Shivaji Nagar, Hadga Road,
Nilanga 413521
Mob.No. 8177970779

**टी.सी.हरवली आहे**

दत्तात्रय अप्पासाहेब बिराजदार इयत्ता बारावी विज्ञानची टी.सी. ( शाळा सोडल्याचा दाखला ) दि.७ ऑगस्ट २०२४ रोजी येणेगूर ते उमरगा बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क**

दत्तात्रय अप्पासाहेब बिराजदार
मु. पो. येणेगूर ता. उमरगा
जि. धाराशिव
**मो. नं.-९५०३९२४०९९**

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : MANIYAR SUMAYYA TO : MANIYAR SUMAIYYA SALIM HENCE FOR THIS DECLARATION

I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE MANIYAR SUMAIYYA SALIM IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

**OLD NAME**
MANIYAR SUMAYYA
**NEW NAME**
MANIYAR SUMAIYYA SALIM
**ADDRESS**
DHUT AUTOMOBAIL GUASPURA LATUR TQ DIST LATUR

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : KHAN SAMEENAKHATOON LIYAKATALI TO : SAMEENA RIYAZ TAKE HENCE FOR THIS DECLARATION

I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE SAMEENA RIYAZ TAKE IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

**OLD NAME**
KHAN SAMEENAKHATOON LIYAKATALI
**NEW NAME**
SAMEENA RIYAZ TAKE
**ADDRESS**
SHIVAJI NAGAR LATUR TQ LATUR DISTRICT LATUR

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : PATEL FIROJABEGAM SAYAD GULAM RASUL SAHEB TO : FIROJABEGAM RAUF DESHMUKH HENCE FOR THIS DECLARATION

I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE FIROJABEGAM RAUF DESHMUKH IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

**OLD NAME**
PATEL FIROJABEGAM SAYAD GULAM RASUL SAHEB
**NEW NAME**
FIROJABEGAM RAUF DESHMUKH
**ADDRESS**
ISLAMPURA TAWARJA COLONY LATUR TQ DISTRICT LATUR

आज आत्ता आणि ताबडतोब लातूर जिल्ह्यातील युनियन बँकेच्या ग्राहकासाठी खुशखबर मुद्रा लोन करून मिळेल आपली सिबिल सिव्हिल ओके पाहिजे तरच लोन मिळेल महाराष्ट्र आंध्र प्रदेश विदर्भ कोणत्याही ठिकाणी बँकेचे अकाउंट असेल लॉगिन करता येईल परंतु कस्टमर ओळखीचा रेफरन्स नंबर लागेल पाठवला लागेल तरच आपल्याला लोन होईल अधिक माहिती व्हाट्सअप वर हाय पाठवा

संपर्क:राहुल हनुमंते ९९ २३ ४६ १८ ६७
राज घंटेवाड ९१११२८५२९३५

**कल्याण बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

**मिलन नाईट बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69 / 98 98 20 38 88

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे** (कल्याणम)

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**


| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



यशवंत
मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३९१८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

# सर्व बहिणींचे संरक्षण करण्याची जबाबदारी माझी : ना. संजय बनसोडे

## *उदगीरला विमानतळ, आरोग्य सेवेसाठी रिसर्च सेंटर व मेडिकल कॉलेज करणार*






**उदगीर (प्रतिनिधी)** बहिण भावाच हे पवित्र नात कायम असत आज पवित्र रक्षाबंधनाचा सण आपण सर्वजण मोठ्या उत्साहात साजरा करतो. आजच्या दिवशी बहिण आपल्या भावाला राखी बांधून औक्षण करते आणि भाऊ आपल्या बहिणीच्या संरक्षणाची जबाबदारी घेतो त्या पध्दतीने आपण इथे जमलेल्या सर्व माझ्या माता भगिनींच्या संरक्षण करण्याची जबाबदारी माझी असल्याचे मत क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर येथील राष्ट्रसंत प.पु. डॉ. शिवलिंग शिवचार्य सद्भक्त मंडळाच्या वतीने आयोजीत रक्षाबंधनाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, बसवराज पाटील कौळखेडकर, ब्रम्हकुमारी महानंदा बहेनजी, महानंदा सोनटक्के, अनिता हैबतपुरे, दिपाली औटे, प्रीती पाटील, डॉ.दिपा भद्रे, डॉ.शितल जाधव, डॉ. सुलोचना येरोळकर, ॲड. दिप्ती नावंदर, डॉ.स्वाती पाटील, शांता लोहारे, प्रा.जयश्री कवठाळे, योगिता पाटील, वंदना तोंडारे, गंगा कपाळे, अरूणा चिमेगावे, अनिता येलमटे, रजनी उस्तुरे, स्वाती भातमोडे, मधुमती कनशेट्टे, आशा रेड्डी, काजल मिरजगावे, वैशाली कांबळे, ॲड.वर्षा कांबळे, अनिता जगताप, प्रतिभा मुळे, प्रणव स्वामी पडोळे, सौ. शिवकांता पडोळे स्वामी, आदी उपस्थित होत्या.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, आज रक्षाबंधनाच्या दिवशी आपण सर्वांनी मला राखी बांधुन माझे औक्षण केले माझ्या या सर्व लाडक्या बहिणींच्या राखीमुळे आणखी काम करण्याची ऊर्जा मिळाली आणि माझ्या सर्व बहिणी माझ्यामागे खंबीरपणे उभे असल्याची प्रचिती आली. आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने गेल्या ५ वर्षात विविध विकास कामे केली. मतदार संघातील सर्व जाती धर्मातील नागरिकांना न्याय दिला. विविध सभागृहे, विविध शासकीय इमारतीसह मतदार संघात वीज, पाणी, रस्ते, सिंचन व आरोग्याच्या सुविधा पुरविल्याने आता उदगीर जिल्ह्याच्या उंबरठ्यावर आले असुन भविष्यात उदगीर मतदार संघाचा विकास मेट्रो सिटीसारखा करणार आहे.

उदगीर हे सांस्कृतिक केंद्र आहे इथे कलाकारांची खाण आहे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने सांस्कृतिक भवन उभारले. भविष्यात भजनी मंडळाच्या समस्या सोडवण्यासाठी राज्याचे सांस्कृतिक मंत्र्यांकडे जावुन कीर्तनकार व भजनी मंडळांना मासिक मानधन देण्यासाठी प्रयत्न करणार असुन येत्या काळात आपण सर्वजण माझ्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिलात तर उदगीरला विमानतळ, आरोग्याच्या सेवेसाठी रिसर्च सेंटर व मेडिकल कॉलेज करणार ग्वाही ना.बनसोडे यांनी दिली.सुत्रसंचलन डॉ. सुरेखा गुजलवार व अंजुम शेख यांनी केले तर आभार प्रीती पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नात्यांचे पावित्र्य जपल्यास संस्कृती टिकून राहील - डॉ.रामकृष्ण बदने




**उदगीर (प्रतिनिधी)** महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात रक्ताच्या नात्यापेक्षाही मानवतेच्या नात्याला अधिक महत्त्व दिले होते. त्यामुळे विविध जाती धर्मातील लोक बसवेश्वरांच्या विचाराशी एकरूप झाले. पैसा, प्रसिद्धी, मान, सन्मान यामुळे आज नात्यांमध्ये दुरावा निर्माण होत आहे. पाश्चिमात्य देशापेक्षा आपली संस्कृती मानवतेच्या दृष्टिकोनातून अतिशय समृद्ध आहे. ही संस्कृती कायम टिकून ठेवायचे असेल, तर नाते जपणे गरजेचे असल्याचे डॉ. रामकृष्ण बदणे यांनी सांगितले.

विरशैव समाज उदगीरच्यावतीने आयोजित ९० वचन सप्ताहातील चौथे पुष्प प्रा.रामकृष्ण बदने यांनी मभारतीय संस्कृतितील नात्यांचे पावित्र्य मया विषयावर गुंफ्फले.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी राष्ट्रिय बसवदलच्या अध्यक्षा श्रीमती लक्ष्मीबाई पांढरे या होत्या तर विचार पीठावर विरशैव समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, उमाकांत वडजे, उपस्थित होते.

प्रारंभी महात्मा बसवेश्वर व धर्मविर संग्रामप्पा शेटकार यांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उदघाटन झाले.

यावेळी रामकष्ण बदने म्हणाले की, फक्त चांगले विचार असुन चालत नाही तर आचरण ही शुध्द असले पाहिजे महात्मा बसवेश्वरांचे विचिराबरोबर आचरण शुध्द होते असे सांगून अने महात्म्यांचा दृष्टांत देऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

अध्यक्षीय समारोपात लक्ष्मीबाई पांढरे म्हणाले की, वचन साहित्याचे केवळ पारायण करून चालणार नाही तर त्यानुसार कृती करणे गरजेचे आहे. महात्मा बसवन्नाचे वचन साहित्य क्रांतिकारी स्वरूपाचे असून समतेची शिकवण देणारे तत्व वचन साहित्यात आहेत.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन ॲड.महेश मळगे तर आभार डॉ.म.ई. तंगावार यांनी मानले.

# उदगीर गुरव समाजातर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा




**उदगीर (प्रतिनिधी)** येथील उदगीर शहर गुरव समाजातर्फे श्रावण महिन्यातील स्नेहभोजन व विद्यार्थी गुणगौरव सोहळा सद्गुरु शंकर लिंग महाराज मठात संपन्न झाला .अध्यक्ष स्थानी दिलीप पाटील होते .प्रमुख पाहुणे पत्रकार नरेश बिरादार ,मंगल होदरणे यांची उपस्थिती होती .यावेळी जनक बिरादार, गायत्री पाटील ,प्रांजली पाटील ,गायत्री पाटील ,अथर्व पाटील बारावीत सोमेश पाटील ,आदिती पाटील, वैदेही येरोळ कर या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी बिरादार म्हणाले विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चिती करून जीवनामध्ये यश संपादन करून आपण ज्या समाजातून आलो त्या समाजाचे देणे लागतो ही भावना ठेवावी .समारोपात दिलीप पाटील म्हणाले विद्यार्थ्यांनी जे यश प्राप्त केले आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील लोकांना करून द्यावा अशाआपेक्षा व्यक्त केली. सूत्रसंचालन संदेश बोरुळकर यांनी केले .आभार भगवान बिरादार यांनी मानले.

# श्यामलाल हायस्कूल मध्ये स्वातंत्र्य दिन साजरा



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील श्यामलाल मेमोरियल हायस्कूल येथे स्वातंत्र्य दिन विविध देशभक्ती पर उपक्रमानी उत्साहात साजरा करण्यात आला.

स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष □ड. सुपोषपाणि आर्य सर यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला. ध्वजारोहाणासाठी प्रमुख अतिथीस एन. सी. सी. प्रमुख सोनाळे बालाजी यांनी पाचरण केले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विविध देशभक्तीपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शासन परिपत्रकानुसार १३,१४व १५ ऑगस्ट या तीनही दिवशी ध्वजारोहन कार्यक्रम संपन्न झाला. या तीनही दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषेत आपले मनोगत व्यक्त केले. आदित्य बयास, बिरादार साइविश्व, शेवाळे मयंक या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिना निमित्त प्रभावी भाषण करून सर्वांची मने जिंकली.

शाळेतील विद्यार्थ्यांनी दंबेल्स, मानवी मनोरे, विविध देशभक्तीपर नृत्य करून सर्वांची मने जिंकली याबद्दल संस्था अध्यक्ष सुपोषपाणि आर्य सर, संस्था उपाध्यक्ष गिरीश मुंडकर, मुखाध्यापक भारत खंदारे, शिक्षक घोगरे संग्राम, कावरे प्रमोद, शिंदे गौतम, सोनाळे बालाजी इत्यादीनी उत्कृष्ट देशभक्तीपर नृत्य व उपक्रम सादरीकरण केल्याबद्दल रोख पारितोषिक देऊन अभिनंदन व कौतुक केले, शुभेच्छा दिल्या,

अध्यक्षीय समारोपमध्ये संस्था अध्यक्ष सुपोषपाणि आर्य सर यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत देशाला मुक्त करण्यासाठी ज्या ज्या शूरवीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली, ज्यांनी देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतीक, शैक्षणिक समृद्धीसाठी आपले योगदान दिले त्या सर्वांचे भावपूर्ण स्मरण व नमन याप्रसंगी केले, यापुढे देशाची धुरा नविन पिढीवर येणार आहे तेंव्हा नविन पिढीनी अधिक सामर्थ्याने हा देश अधिक एकसंघ कसा राहील व समृद्ध होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, जगातील सर्वात मोठी लोकशाही अधिक मजबूत होण्यासाठी सर्वांचे सामूहिक देशविकासाचे प्रयत्न गरजेचे आहेत, सर्वांनी जात, प्रांत, धर्म,भेद बाजूला ठेऊन आपण फक्त भारतीय आहोत आणि सर्व भारतीय आपले बंधु भगिनी आहेत ही एकच भावना आपल्या मनात तेवत ठेवावी, देशाचा विकास हाच माझा विकास या भावनेने आपले कर्तव्य पार पाडावे अश्या स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा सर्वांना दिल्या.

स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रभावीरित्या सूत्रसंचालन उमाकांत सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाचे आभार मुख्याध्यापक भारत खंदारे यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# ज्ञानेश्वर आईलवाड यांचे जिल्हस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**उदगीर (प्रतिनिधी)** येथील श्यामलाल हायस्कूल चा विद्यार्थी ज्ञानेश्वर आईलवाड याची ४८किलो वजन गट अंतर्गत जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲडव्होकेट सुपोषपाणि आर्य, उपाध्यक्ष गिरीश मुंडकर, सचिव ॲड.विक्रम संकाये सहसचिव अंजुमनी आर्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक भारत खंदारे पर्यवेक्षक राहुल लिमये तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी या विद्यार्थ्याचे व मार्गदर्शक दिनेश बोळेगावे यांचे घवघवीत यशाबद्दल अभिनंदन व कौतुक केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# लालबहादूर शास्त्री विद्यालयात संस्कृत दिन व रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न



**उदगीर (प्रतिनिधी)** दि.१९येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात संस्कृत दिन व रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रमुख कु.सौम्या जांभळे तर प्रमुख अतिथी संस्कृत शिक्षिका जान्हवी देशमुख तसेच कु.धनश्री सावळसुरकर होत्या.

व्यासपीठावर उपमुख्याध्यापक अरुण पत्की,पर्यवेक्षक कृष्णा मारामार ,किरण नेमट, माधव मठवाले यांची उपस्थिती होती.

जान्हवी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रामायण, महाभारत यासारखे महाकाव्य तसेच विविध ग्रंथाच्या माध्यमातून संस्कृत भाषेचे महत्व स्पष्ट केले. तर धनश्री सावळसुरकर या विद्यार्थिनींने रक्षाबंधनातून सामाजिक ऐक्य साधले जाते असा संदेश दिला.

अध्यक्षीय समारोपात सौम्या जांभळे हिने बहीण भावाच्या अतूट नात्याला जोडणाऱ्या रक्षाबंधन या सणाचे महत्त्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

विद्यार्थिनींनी शालेय परिसरातील वृक्षांना राख्या बांधून हा सण साजरा केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती बोडके, वैदही कासले, प्रास्ताविक किंजल काटकर, स्वागत व परिचय सात्विक जाधव, तसेच वैयक्तिक गीत सिद्धांत मोरखंडे व वेदांत मोरखंडे आभार वेदांत शिरसे तर कल्याण मंत्रांनी कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख संघप्रिया गायकवाड, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.